दैनिक
# हिंदू प्रकाशवार्ता

epaper.hinduprakashwarta.com
Web portal : hinduprakashwarta.com
PRGI No.: MHMAR/25/A2358
सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

छत्रपती संभाजीनगर ❀ मंगळवार, दि. २१ जुलै २०२६ ❀ वर्ष : १ ❀ अंक : ९१ ❀ पाने : ४ ❀ किंमत : ४ रू. ❀ Email : hinduprakashvarta@gmail.com

### राष्ट्रपती मुर्मू मोल्दोव्हामध्ये दाखल; उपपंतप्रधानांकडून स्वागत

**नवी दिल्ली :** राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू सोमवारी मोल्दोव्हा या देशाच्या ऐतिहासिक दौऱ्यावर पोहोचल्या. कोणत्याही भारतीय राष्ट्रप्रमुखाचा हा मोल्दोव्हाला झालेला पहिलाच दौरा आहे. व्यापार, तंत्रज्ञान, पर्यटन आणि इतर विविध क्षेत्रांतील सहकार्य वृद्धिंगत करण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या त्यांच्या तीन युरोपीय देशांच्या दौऱ्याचा हा एक भाग आहे. राष्ट्रपती भवनाने एक्सवरील एका पोस्टमध्ये म्हटले आहे की, चिशिनाउ आंतरराष्ट्रीय विमानतळावर आगमन झाल्यानंतर मोल्दोव्हा प्रजासत्ताकाचे उपपंतप्रधान व परराष्ट्रमंत्री मिहाई पोपशोई यांनी त्यांचे मनःपूर्वक स्वागत केले.

### धर्मेंद्र प्रधान गृहमंत्र्यांच्या भेटीला

**नवी दिल्ली :** संसदेच्या पावसाळी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी राजधानी दिल्लीत मोठा राजकीय गोंधळ निर्माण झाला. 'कॉकरोच जनता पार्टी' (CJP) ने संसदेवर मोर्चा काढण्याची घोषणा केल्यानंतर जंतरमंतर परिसरात मोठ्या प्रमाणावर पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. दिल्ली पोलिसांनी आंदोलकांना जंतरमंतरपासून सुमारे एक किलोमीटर अंतरावर असलेल्या केवळ भवनापर्यंत मोर्चाची परवानगी दिली. मात्र, यावरून आंदोलक आणि पोलिसांमध्ये वाद निर्माण झाला आणि परिस्थिती चिघळल्यानंतर शीघ्र कृती दलाच्या (RAF) जवानांनी आंदोलकांवर लाठीमार केल्याची घटना घडली.

## थोडक्यात वार्ता

### मुसळधार पावसाचा इशारा; मुंबई, ठाणे-रायगडला ऑरेंज अलर्ट

**मुंबई :** काही दिवसांच्या विश्रांतीनंतर मुंबईत पुन्हा पावसाने जोरदार पुनरागमन केले आहे. सोमवारी शहरातील अनेक भागांत हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या सरी कोसळल्या. दरम्यान, भारतीय हवामान विभागाने (IMD) २१ जुलैसाठी मुंबई, ठाणे आणि रायगड जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट जारी केला असून, पुढील 24 तासांत मुसळधार ते अतिमुसळधार पावसाची शक्यता व्यक्त केली आहे. IMD च्या ताज्या अंदाजानुसार, मुंबई, ठाणे आणि रायगड जिल्ह्यांतील काही ठिकाणी मुसळधार ते अतिमुसळधार पाऊस पडू शकतो. यासोबतच ताशी ५० ते ६० किलोमीटर वेगाने वारे वाहण्याची शक्यता असल्याने नागरिकांनी विशेष काळजी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. तर पालघर आणि रत्नागिरी जिल्ह्यांसाठी यलो अलर्ट जारी करण्यात आला असून, या भागांतही काही ठिकाणी जोरदार पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. सोमवारी दिवसभर मुंबईतील अंधेरी, वांद्रे, विलेपार्ले, दादर, भांडुप आणि मुलुंड या भागांत पावसाच्या सरी कोसळल्या.

### 23 दिवसांनंतर सोनम वांगचुक यांचे उपोषण अखेर संपले!

**नवी दिल्ली :** तब्बल २३ दिवसांपासून सुरू असलेल्या आमरण उपोषणाला पर्यावरणवादी आणि शिक्षण सुधारणा चळवळीचे प्रमुख सोनम वांगचुक यांनी अखेर सोमवारी पूर्णविराम दिला. केंद्रीय आरोग्यमंत्री आणि भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांच्यासोबत आंदोलनाच्या प्रतिनिधींची महत्त्वपूर्ण बैठक झाल्यानंतर हा निर्णय घेण्यात आला. सरकार आणि आंदोलनकर्त्यांमध्ये सकारात्मक संवाद सुरू झाल्याने वांगचुक यांनी उपोषण मागे घेत असल्याची घोषणा केली. सततच्या उपोषणामुळे वांगचुक यांची प्रकृती गंभीररीत्या खालावली होती. १८ जुलै रोजी त्यांना दिल्लीतील सफदरजंग रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. शरीरात पाण्याची कमतरता (डिहायड्रेशन), पोटॅशियमची धोकादायकरीत्या घटलेली पातळी आणि वाढलेले केटोन यांसारखी गंभीर लक्षणे आढळल्यानंतर डॉक्टरांनी त्यांना तातडीने वैद्यकीय उपचार सुरू केले. आंदोलनकर्त्यांसोबत झालेल्या बैठकीनंतर जे. पी. नड्डा यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म 'एक्स' वर माहिती देत सांगितले की, सरकार आणि आंदोलनकर्त्यांमधील चर्चा अत्यंत सकारात्मक आणि सौहार्दपूर्ण वातावरणात झाली.

### त्रिपुरा राज्याचे पोलीस महासंचालक अनुराग धनकर यांचा कार्यालयातच आढळला मृतदेह

**आगरतळा :** सोमवारचा दिवस त्रिपुरा राज्यासाठी अत्यंत धक्कादायक ठरला. राज्याचे सर्वोच्च पोलीस अधिकारी म्हणजेच पोलीस महासंचालक अनुराग धनकर हे आगरतळा येथील पोलीस मुख्यालयातील त्यांच्याच दालनात मृतावस्थेत आढळले. या घटनेची माहिती मिळताच मुख्यालयात एकच खळबळ उडाली. त्यांना तातडीने गोविंद वल्लभ पंत रुग्णालयात दाखल करण्यात आले. तेथे डॉक्टरांनी त्यांचे प्राण वाचवण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले, मात्र दुपारी १२.४८ वाजता त्यांना अधिकृतरीत्या मृत घोषित करण्यात आले. प्राथमिक अहवालानुसार, या वरिष्ठ आयपीएस अधिकाऱ्याने गळफास घेऊन आपली जीवनयात्रा संपवली असावी, असा संशय व्यक्त केला जात आहे. मात्र, या धक्कादायक मृत्यूमागचे नेमकं कारण आणि परिस्थिती अद्याप अधिकृतरीत्या स्पष्ट झालेली नाही, अशी माहिती मुख्यमंत्र्यांचे सचिव किरण गिट्टे यांनी दिली. रुग्णालयातील वरिष्ठ डॉक्टर डॉ. प्रदीप भौमिक यांनी सांगितले की, धनखड यांना दुपारी १२ च्या सुमारास रुग्णालयात आणले तेव्हा त्यांच्यात नाडीचे ठोके, रक्तदाब किंवा शरीराचे तापमान यांसारखी कोणतीही जिवंत असल्याची लक्षणे आढळून येत नव्हती.

### "शाल जोडे"




# टॅटूचा शौक पडला महागात! काही आठवड्यांत महिला HIV पॉझिटिव्ह; डॉक्टरांचा गंभीर इशारा

**कानपूर :** टॅटू काढण्याची आवड एका ३२ वर्षीय महिलेला चांगलीच महागात पडल्याची धक्कादायक घटना उत्तर प्रदेशातील कानपूरमध्ये समोर आली आहे. दिल्लीतील एका टॅटू पार्लरमध्ये टॅटू काढल्यानंतर काही आठवड्यांतच महिलेची प्रकृती बिघडली. वैद्यकीय तपासणीत ती HIV पॉझिटिव्ह असल्याचे निष्पन्न झाले. टॅटू काढताना वापरण्यात आलेली सुई दूषित किंवा योग्य प्रकारे निर्जंतुक न केल्यामुळे संसर्ग झाल्याचा प्राथमिक संशय डॉक्टरांनी व्यक्त केला आहे.

**गंभीर संसर्गानंतर रुग्णालयात दाखल :** कानपूरमधील रहिवासी असलेली ही महिला काही दिवसांपूर्वी जीएसव्हीएम मेडिकल कॉलेजच्या त्वचारोग विभागात उपचारासाठी दाखल झाली होती. तिला गंभीर संसर्गाची तक्रार होती. तिची प्रकृती लक्षात घेऊन डॉक्टरांनी HIV आणि हेपेटायटिस-बीच्या चाचण्या करण्याचा सल्ला दिला. चाचणी अहवाल आल्यानंतर महिला HIV बाधित असल्याचे स्पष्ट झाले, ज्यामुळे डॉक्टरांनाही धक्का बसला.

**टॅटूनंतर प्रकृती बिघडली :** जीएसव्हीएम मेडिकल कॉलेजच्या त्वचारोग विभागातील असोसिएट प्राध्यापक डॉ. श्वेतांक यांनी



सांगितले की, रुग्णाने रुग्णालयात येण्याच्या सुमारे दोन आठवडे आधी दिल्लीतील एका टॅटू स्टुडिओमध्ये टॅटू काढला होता. त्यानंतर तिची प्रकृती खालावत गेली. प्राथमिक तपासात टॅटूसाठी वापरण्यात आलेली सुई दूषित असण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. मात्र, संसर्गाचा नेमका स्रोत निश्चित करण्यासाठी पुढील तपास सुरू असल्याचे डॉक्टरांनी सांगितले.

**मोफत उपचार सुरू :** महिलेची शासकीय रुग्णालयातील अँटी-रेट्रोव्हायरल थेरपी (ART) सेंटरमध्ये नोंदणी करण्यात आली असून, तिच्यावर आवश्यक उपचार सुरू आहेत. डॉक्टरांच्या मते, HIV पूर्णपणे बरा करणारे औषध उपलब्ध नसले, तरी नियमित औषधोपचार आणि वेळेवर उपचार घेतल्यास रुग्ण दीर्घकाळ सामान्य आयुष्य जगू शकतो.

**टॅटू काढण्यापूर्वी 'या' गोष्टींची घ्या काळजी :** या घटनेच्या पार्श्वभूमीवर डॉक्टरांनी नागरिकांना महत्त्वाचा इशारा दिला आहे. त्यांनी सांगितले की, टॅटू काढताना केवळ अधिकृत आणि स्वच्छतेचे नियम पाळणाऱ्या स्टुडिओची निवड करावी.

**विशेषतः खालील गोष्टींची खात्री करावी :** - प्रत्येक ग्राहकासाठी नवीन आणि निर्जंतुक सुई वापरली जात आहे का? - टॅटू कलाकार हातमोजे आणि स्वच्छ उपकरणांचा वापर करतो का? - वापरली जाणारी शाई सुरक्षित आणि दर्जेदार आहे का? - स्टुडिओमध्ये स्वच्छतेचे नियम पाळले जात आहेत का?

डॉक्टरांनी असेही सांगितले की, दूषित सुईमुळे HIV, हेपेटायटिस-बी आणि इतर रक्ताद्वारे पसरणाऱ्या संसर्गांचा धोका वाढू शकतो. तसेच काही रंगीत शाईमुळे त्वचेवर ॲलर्जी, सूज, लाल चट्टे आणि दीर्घकालीन दाह यांसारख्या समस्या उद्भवू शकतात. विशेषतः लाल आणि हिरव्या रंगाच्या शाईमुळे त्वचेच्या प्रतिक्रिया अधिक प्रमाणात दिसून येतात.

**डॉक्टरांचा सल्ला :** तज्ज्ञांच्या मते, टॅटू हा फॅशनचा भाग असला तरी तो सुरक्षित पद्धतीनेच करून घ्यावा. स्वच्छता आणि निर्जंतुकीकरणाच्या नियमांकडे दुर्लक्ष केल्यास गंभीर संसर्गाचा धोका निर्माण होऊ शकतो. त्यामुळे टॅटू काढण्यापूर्वी संबंधित स्टुडिओची विश्वासार्हता आणि स्वच्छतेची खात्री करणे अत्यंत आवश्यक आहे.

# राम मंदिरातील देणगी चोरी प्रकरणी तपासासाठी एसआयटीची पुनर्रचना करावी - सर्वोच्च न्यायालय

**नवी दिल्ली :** अयोध्या येथील श्री राम जन्मभूमी मंदिरात भाविकांकडून मिळालेल्या देणग्यांमधील अपहार आणि आर्थिक अनियमिततेच्या आरोपांसंदर्भातील खटल्याची सुनावणी सर्वोच्च न्यायालयात झाली. तपास पूर्णपणे निष्पक्ष, पारदर्शक आणि व्यावसायिक पद्धतीने झाला पाहिजे, असे न्यायालयाने स्पष्टपणे सूचित केले. सर्वोच्च न्यायालयाने उत्तर प्रदेश सरकारला विशेष तपास पथकाच्या (SIT) पुनर्रचनेबाबत आवश्यक सूचना घेण्यास सांगितले आहे. या संपूर्ण प्रकरणाचे राजकारण होऊ नये आणि तपास तार्किक निष्कर्षापर्यंत पोहोचला पाहिजे, असेही न्यायालयाने स्पष्ट केले.

सरन्यायाधीश सूर्यकांत, न्यायमूर्ती जॉयमाल्या बागची आणि न्यायमूर्ती व्ही. मोहन यांचा समावेश असलेले खंडपीठ अयोध्या राम मंदिरात मिळालेल्या देणग्यांच्या कथित अपहाराची सीबीआय चौकशी करण्याची मागणी करणाऱ्या याचिकांवर सुनावणी करत होते. यापूर्वी न्यायालयाने उत्तर प्रदेश



सरकारने स्थापन केलेल्या विशेष तपास पथकाकडून (SIT) तपासाचा सद्यस्थिती अहवाल मागवला होता. सुनावणीदरम्यान, सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी न्यायालयाला माहिती दिली की, आदेशाचे पालन करून सद्यस्थितीचा अहवाल दाखल करण्यात आला आहे. तपास सुरू असून, आतापर्यंत आठ जणांना अटक करण्यात आली आहे. तथापि, तपासाच्या या टप्प्यावर अधिक माहिती देणे योग्य ठरणार नाही, असे त्यांनी सांगितले.

सुनावणी दरम्यान, सरन्यायाधीशांनी सर्वप्रथम विचारले की, सध्या एसआयटी (SIT) तपास करत आहे का. सॉलिसिटर जनरल यांनी सांगितले की, सध्या राज्य पोलीस तपास करत असून, कोणतीही स्वतंत्र एसआयटी कार्यरत नाही. त्यानंतर न्यायालयाने एसआयटीची रचना आणि तपास अधिकाऱ्यांविषयी प्रश्न विचारले. सरन्यायाधीशांनी सांगितले की, उपलब्ध माहितीनुसार, या व्यवस्थेत दोन आयएएस (IAS) अधिकारी आणि एक वरिष्ठ आयपीएस (IPS) अधिकारी सामील आहेत. न्यायालयाने सुचवले की, सुरू असलेल्या तपासासाठी एसआयटीची पुनर्रचना करावी आणि अशा तपासाचा पुरेसा अनुभव असलेल्या एका वरिष्ठ आयपीएस अधिकाऱ्याला त्याचे प्रमुख बनवावे. न्यायालयाने उत्तर प्रदेश सरकारला या संदर्भात सूचना मागवून पुढील सुनावणीत माहिती देण्यास सांगितले. सर्वोच्च न्यायालयाने अद्याप अंतिम आदेश दिलेला नाही. न्यायालयाने उत्तर प्रदेश सरकारला एसआयटीच्या पुनर्रचनेबाबत आवश्यक सूचना मिळवण्यास आणि पुढील सुनावणीत आपली भूमिका स्पष्ट करण्यास सांगितले आहे. कोणत्या एजन्सीने आणि कोणत्या स्तरावरील अधिकाऱ्याने तपासावर देखरेख करावी, याचाही न्यायालय आढावा घेईल.

### सीजेपीच्या संसद मोर्च्यात हिंसाचार, पार्लमेंट स्ट्रीटजवळ आंदोलकांकडून दगडफेक उपनिरीक्षकांसह अनेक कर्मचारी जखमी

**नवी दिल्ली :** नवी दिल्लीतील पार्लमेंट स्ट्रीट भागात 'कॉकरोच जनता पार्टी'च्या संसदेवरील महामोर्च्यादरम्यान परिस्थिती अत्यंत चिघळली आहे. संसदेच्या दिशेने जाणाऱ्या आंदोलकांनी सुरक्षेचे अडथळे (बॅरिकेड्स) तोडण्याचा प्रयत्न केला असता आंदोलक आणि पोलिसांमध्ये जोरदार संघर्ष झाला. या चकमकीदरम्यान आंदोलकांनी केलेल्या दगडफेकीत दिल्ली पोलिसांचे एक उपनिरीक्षक आणि काही पोलीस जवान जखमी झाले आहेत. पार्लमेंट स्ट्रीटवर सुरक्षेसाठी तैनात असलेले आणि दगडफेकीत जखमी झालेले दिल्ली पोलिसांचे उपनिरीक्षक यांनी घटनेची माहिती देताना सांगितले, "आम्ही पार्लमेंट स्ट्रीटजवळील बॅरिकेड्सजवळ कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी शांततेत उभे होतो. त्याच वेळी आंदोलकांच्या गर्दीतून अचानक आमच्यावर दगडफेक सुरू करण्यात आली, ज्यामध्ये माझ्या एका सहकाऱ्यासह मी जखमी झालो."

संसदेचे पावसाळी अधिवेशन सुरू असतानाच आंदोलकांनी संसदेच्या अति-सुरक्षित भागात घुसण्याचा प्रयत्न केला. जंतर-मंतरवरून पार्लमेंट स्ट्रीटच्या दिशेने निघालेल्या मोर्चाला पोलिसांनी रोखण्याचा प्रयत्न केला. या वेळी आंदोलकांकडून अचानक दगडफेक सुरू झाली, ज्यामुळे परिसरात एकच गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. पोलीस अधिकारी जखमी झाल्यानंतर प्रशासनाने तातडीने रॅपिड ॲक्शन फोर्स आणि दंगल नियंत्रण पथकाची अतिरिक्त कुमक पार्लमेंट स्ट्रीटवर तैनात केली असून संपूर्ण परिसराला छावणीचे स्वरूप आले आहे.

**गर्दी पांगवण्यासाठी अश्रूधुराचा वापर :**

आंदोलकांना रोखण्यासाठी पोलिसांकडून लाठीमार करण्यात आला. तसेच, गर्दी पांगवण्यासाठी अश्रूधुराचा वापर केला. संसदेच्या सुरक्षेच्या कारणास्तव संसदेची प्रवेशद्वारे बंद केली होती. शिवाय खबरदारी म्हणून अग्निशामक दलाचे जवान आणि सुरक्षा दलाचे जवान संसद परिसरात तैनात केले आहेत. संसद भवनाच्या बाहेर देखील पोलीस बंदोबस्त आणि बॅरिकेड्स लावले होते.

### मराठी भाषा जतन आणि संवर्धनासाठी प्रभावी कृती आराखडा राबवा - मुख्यमंत्री

**मुंबई :** मराठी भाषा, साहित्य आणि बोलींच्या जतन आणि संवर्धनासाठी प्रभावी कृती आराखडा तयार करून त्याची अंमलबजावणी करावी; तसेच राज्य मराठी विकास संस्थेच्या कामकाजात सातत्य, पारदर्शकता आणि परिणामकारकता यावी यासाठी वर्षभरातील सर्व वैधानिक बैठकींचे वेळापत्रक आगाऊ निश्चित करावे, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. सह्याद्री अतिथीगृह येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली राज्य मराठी विकास संस्थेच्या नियामक मंडळाची बैठक झाली, त्यावेळी ते बोलत होते. मराठी भाषा मंत्री डॉ. उदय सामंत, मराठी भाषा विभागाचे सचिव डॉ.किरण कुलकर्णी, राज्य मराठी विकास संस्थेचे संचालक डॉ. श्यामकांत देवरे, साहित्य संस्कृती मंडळाचे अध्यक्ष डॉ.सदानंद मोरे, भाषा संचालक अरुण गीते; तसेच राज्य मराठी विकास संस्थेचे अशासकीय सदस्य प्रत्यक्ष व दूरदृश्य प्रणालीद्वारे बैठकीस उपस्थित होते. राज्य मराठी विकास संस्थेची सर्व वैधानिक अनुपालने पूर्ण झाल्याबद्दल मुख्यमंत्री फडणवीस यांनी संस्थेचे अभिनंदन केले. ते म्हणाले की, संस्थेचा गेल्या काही वर्षांचा प्रशासकीय व वैधानिक अनुशेष (बॅकलॉग) पूर्ण झाल्याने संस्थेची प्रशासकीय रचना अधिक सक्षम झाली आहे. आता मराठी भाषेचा प्रचार, प्रसार, संशोधन आणि संवर्धन यासाठी ठोस धोरणे राबविण्यावर भर देणे आवश्यक आहे. संस्थेच्या कर्मचाऱ्यांचे प्रलंबित प्रश्नही सकारात्मक भूमिकेतून सोडविण्यात येतील.

# राज्यसभेच्या नवनिर्वाचित ९ सदस्यांनी घेतली शपथ

**नवी दिल्ली :** संसदेच्या पावसाळी अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी, सोमवारी राज्यसभेच्या ९ नवनिर्वाचित सदस्यांनी सभागृहाच्या सदस्यत्वाची शपथ घेतली. यापैकी पाच सदस्यांनी हिंदीत, दोन सदस्यांनी इंग्रजीत तर दोन सदस्यांनी बंगालीत शपथ घेतली. राज्यसभेचे सभापती सी. पी. राधाकृष्णन यांनी या नवनिर्वाचित सदस्यांना शपथ दिली. शपथ घेणाऱ्या सदस्यांमध्ये गुजरातमधील भाजपचे मुकेशभाई जे. राठवा, कर्नाटकमधील काँग्रेसचे पवन खेडा, मध्य प्रदेशातील भाजपचे महेश केवट, मेघालयमधील नॅशनल पीपल्स पार्टीचे जेम्स पांगसांग कोंगकल संगमा, मिझोरममधील खिआंगते लालटलुआंगकिमा, राजस्थानमधील भाजपचे डॉ. सतीश पूनिया तसेच पश्चिम बंगालमधील भाजपचे प्रकाश चिक बराईक, सुश्मिता देव आणि सुखेंदू शेखर रे यांचा समावेश आहे.

**संसदेच्या दोन्ही सभागृहांचे कामकाज मंगळवारपर्यंत स्थगित :**

मान्सून अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी सोमवारी लोकसभा आणि राज्यसभेतील कामकाज विरोधकांच्या जोरदार घोषणाबाजी आणि गोंधळामुळे अनेक वेळा तहकूब करण्यात आले. अखेर राज्यसभेचे कामकाज दुपारी अडीच वाजेपर्यंत आणि लोकसभेचे कामकाज दुपारी तीन वाजेपर्यंत तहकूब करण्यात आले. त्यानंतर दोन्ही सभागृहांचे कामकाज मंगळवार २१ जुलैपर्यंत स्थगित करण्यात आले.

# जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या निवडणुकीत दोन आमदारसह व इतर सहा जण विजयी

### संचालकामध्ये आ. सईद खान आ. नवघरे, मुटकुळे डाखोरे चौकट सावंत मांयदळे. हे विजयी झाले आहेत

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी.

**परभणी:-** परभणी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या चुरशीच्या निवडणुकीत आ. सईद खान. आ. चंद्रकांत नवघरे, शोभा बोबडे, राजामती मुटकुळे, नंदकुमार डाखोरे, आकाश चौखट, अभय सावंत, दत्तात्रय मांयदळे हे सर्व उमेदवारविजयी झाले आहेत.

बँकेच्या 21 संचालकापैकी 13 संचालक बिनविरोध निवडून आले होते उर्वरित आठ संचालकासाठी रविवारी मतदान झाले तर आज दिनांक 20 जुलै रोज सोमवारी सकाळी मतमोजणी पूर्ण झाली.

प्राथमिक कृषी पतपुरवठा विविध सहकारी संस्था गटातील पूर्णा मतदारसंघातून नंद कुमार डाखोरे हे विजय झालेले आहेत त्यांना 34 मते पडली तर पराभूत तुळशीराम बोबडे यांना 28 मते पडली. मानवत मतदार संघातून आकाश चोखट हे विजय झाले आहेत त्यांना वीस मते पडली तर पराभूत अमोल कदम यांना 15 मते पडली हिंगोली मतदारसंघातून राजा मती मुटकुळे ह्या विजय झाल्या



असून त्यांना 59 मते मिळाली तर पराभूत गणेश शिंदे यांना 31 मते पडली वसमत मतदारसंघातून आमदार चंद्रकांत नवघरे विजय झाले आहेत त्यांना आठवण मते पडली तर पराभूत तुषार जाधव यांना 20 मते पडली कळमनुरी मतदार संघातून अभय सावंत विजय झाले असून त्यांना 35 मते पडली तर पराभूत बा ला साहेब मगर यांना 30 मते पडले झाली होती आमदार सईद खान विजय झाले असून त्यांना 290 मते पडली तर पराभूत विजय 287 मते पडली शोभा बोबडे या विजयी झाल्या असून त्यांना 1216 मते पडली तर पराभूत अतुल सरोदे यांना 176 मते मिळाली विमुक्त जमाती भटक्या जमाती विमाप्र गटातून दत्तात्रय मांय दळे हे विजयी झाले असून त्यांना 1066 मते पडली तर पराभूत सुरजसिंह परिहार यांना 348 मते पडली या संपूर्ण प्रक्रियेत निवडणूक निर्णय अधिकारी एस पी काकडे यांनी निकाल घोषित करून मतमोजणी सुरळीत पार पाडण्यासाठी सहाय्यक निवडणूक अधिकारी बीएस नांदापूरकर लेखापरीक्षक राजेश देशमुख लोणीकर यांनी परिश्रम घेतले

मतमोजणी शांततेत पार पाडण्यासाठी पोलिसांचा चौक बंदोबस्त देण्यात करण्यात आला होता हर्ष उल्हास यामध्ये मोठा जल्लोषात गुलाल उधळत विजय साजरा केला.

# बातमीचा इम्पॅक्ट : जिल्हा परिषद मुख्यालयातील कचऱ्याची तातडीने साफसफाई

### स्वच्छतागृहाशेजारी साचलेला कचरा हटवला; प्रशासनाने घेतली तातडीची दखल

हिंदू प्रकाशवार्ता : सिद्धेश्वर थोर

**छत्रपती संभाजीनगर :** जिल्हा परिषद मुख्यालयातील स्वच्छतागृहाशेजारी मोठ्या प्रमाणात साचलेल्या कचऱ्याबाबत हिंदू प्रकाशवार्तानि प्रसिद्ध केलेल्या वृत्ताची प्रशासनाने तातडीने दखल घेतली. बातमी प्रसिद्ध होताच संबंधित विभागाने तत्काळ कारवाई करत संपूर्ण परिसराची साफसफाई केली. त्यामुळे अनेक दिवसांपासून स्वच्छतागृहालगत साचलेला प्लास्टिक, झाडांच्या फांद्या, थर्माकोल, रिकाम्या पाण्याच्या बाटल्या व इतर घनकचरा हटविण्यात आला.





गावोगावी स्वच्छतेचे धडे... जिल्हा परिषद मुख्यालयातच कचऱ्याचे साम्राज्य
स्वच्छतागृहाशेजारीच मोठ्या प्रमाणात कचरा टाकण्याचा प्रकार; 'स्वच्छतेचा संदेश देणारे' मुख्यालयच अस्वच्छ
स्वच्छता व्यवस्थेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.
विशेष म्हणजे हा कचरा एखाद्या दिवसाचा नसून तो नियमितपणे या ठिकाणी आणून टाकला जात असल्याचे दिसून येत आहे. जिल्हा परिषदेच्या मुख्यालयात दररोज शेकडो नागरिक विविध कामांसाठी येत असतात. अधिकारी, कर्मचारी आणि ग्रामपंचायतींचे प्रतिनिधी यांचीही मोठ्या प्रमाणात वर्दळ असते. अशा ठिकाणी स्वच्छतागृहालगतच कचऱ्याचे ढीग साचलेले दिसणे हे प्रशासनासाठी लाजिरवाणे चित्र मानले जात आहे.
जिल्हा परिषदेमार्फत गावागावांत स्वच्छता, प्लास्टिकमुक्ती आणि घनकचरा व्यवस्थापनाबाबत जनजागृती केली जाते. ग्रामपंचायतींना स्वच्छतेबाबत सूचना दिल्या जातात. मात्र, ज्या कार्यालयातून संपूर्ण जिल्ह्याला स्वच्छतेचे धडे दिले जातात, त्याच कार्यालयात स्वच्छतेच्या नियमांचे पालन होत नसल्याचे चित्र समोर आल्याने प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्न उपस्थित होत आहेत.
पावसामुळे कचरा कुजल्याने त्या ठिकाणी दुर्गंधीसह डास, माशा आणि इतर कीटकांची वाढ होण्याची शक्यता आहे. परिणामी कर्मचारी, अधिकारी आणि नागरिकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होण्याची भीती व्यक्त होत आहे. स्वच्छतागृह परिसरातच कचरा साचल्यामुळे संसर्गजन्य आजारांचा धोका वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही. स्वच्छ भारत अभियान आणि स्वच्छ कार्यालयाचा संदेश देणाऱ्या जिल्हा परिषदेने सर्वप्रथम स्वतःचे मुख्यालय स्वच्छ ठेवणे अपेक्षित आहे. मात्र प्रत्यक्षात स्वच्छतागृहाशेजारीच कचरा टाकला जात असल्याचे चित्र प्रशासनाच्या दाव्यालाच छेद देणारे आहे. त्यामुळे मुख्यालय परिसरातील कचऱ्याची तातडीने विल्हेवाट लावून अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी जबाबदार विभागाने कठोर उपाययोजना कराव्यात, अशी मागणी होत आहे.

जिल्हा परिषद मुख्यालयात दररोज शेकडो नागरिक, अधिकारी, कर्मचारी तसेच ग्रामपंचायतींचे प्रतिनिधी ये-जा करत असतात. अशा ठिकाणी कचऱ्याचे ढीग साचल्यामुळे प्रशासनाच्या स्वच्छता व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले होते. याबाबत हिंदू प्रकाशवार्तानि "गावोगावी स्वच्छतेचे धडे... जिल्हा परिषद मुख्यालयातच कचऱ्याचे साम्राज्य" या मथळ्याखाली वृत्त प्रसिद्ध केले होते.

वृत्ताची गंभीर दखल घेत प्रशासनाने तत्काळ स्वच्छता मोहीम राबवून परिसर स्वच्छ केला. कचऱ्याची विल्हेवाट लावण्यात आल्याने परिसरातील दुर्गंधी कमी झाली असून कर्मचारी व नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

दरम्यान, भविष्यात अशा प्रकारे मुख्यालय परिसरात कचरा साचणार नाही, यासाठी नियमित स्वच्छता, कचऱ्याची योग्य विल्हेवाट आणि संबंधित विभागाकडून सातत्याने देखरेख ठेवण्याची अपेक्षा नागरिकांनी व्यक्त केली आहे.

# सं पा द की य

## ग्रामीण विकासाला नवी गती आणि स्थानिक स्वराज्य संस्थांचे सक्षमीकरण

राज्य सरकारने जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत ग्रामपंचायतींना जनसुविधांसाठी मिळणाऱ्या विशेष अनुदान योजनेच्या व्याप्तीमध्ये सुधारणा करण्याचा घेतलेला निर्णय ग्रामीण महाराष्ट्राच्या कायापालटासाठी अत्यंत महत्त्वाचा आणि स्वागतार्ह आहे. ग्रामीण भागाचा शाश्वत विकास केवळ रस्ते आणि गटारांपुरता मर्यादित न ठेवता, त्यात सौरऊर्जा, क्रीडा, आणि बौद्धिक विकासासारख्या आधुनिक घटकांचा समावेश करणे ही काळाची गरज आहे. ग्रामीण भागातून सातत्याने होणाऱ्या मागण्यांची दखल घेऊन प्रशासनाने जनसुविधा योजनेच्या मार्गदर्शक सूचनांमध्ये केलेले हे बदल स्थानिक स्वराज्य संस्थांना अधिक सक्षम आणि स्वावलंबी बनवणारे ठरतील. नव्या धोरणानुसार ग्रामपंचायतींच्या निधीत वाढ करण्यात आली असून, सौरऊर्जा प्रकल्प, क्रीडांगण विकास, वाचनालय यांसारख्या पाच नवीन कामांचा प्रामुख्याने समावेश करण्यात आला आहे. शासकीय कार्यालयांवर सौरऊर्जा यंत्रणा बसवण्यासाठी सर्वाधिक वीस लाख रुपयांपर्यंतची आणि सार्वजनिक दिवाबत्तीसाठी पंधरा लाख रुपयांची मर्यादा निश्चित केल्यामुळे गावांची पारंपरिक विजेवरील निर्भरता कमी होईल. यामुळे ग्रामपंचायतींचा विजेचा खर्च वाचून तो निधी इतर विकासकामांसाठी वापरता येईल. तसेच, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी वाचनालय आणि क्रीडा कौशल्याला प्रोत्साहन देण्यासाठी क्रीडांगणाचा विकास करण्यासाठी प्रत्येकी वीस लाख रुपयांची केलेली तरतूद ग्रामीण भागातील मानवी संसाधनांचा दर्जा उंचावण्यासाठी मैलाचा दगड ठरेल. या योजनेचा दुसरा आणि अत्यंत महत्त्वाचा पैलू म्हणजे शासकीय निधीचा अपव्यय टाळण्यासाठी आणि पारदर्शकता राखण्यासाठी तयार करण्यात आलेली कठोर नियमावली होय. मंजूर करण्यात आलेली कामे अन्य कोणत्याही योजनेतून दुबार घेता येणार नाहीत, हा नियम प्रशासकीय भ्रष्टाचार आणि निधीची उधळपट्टी रोखण्यासाठी अत्यंत आवश्यक होता. यामुळे जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून मिळणाऱ्या प्रत्येक रुपयाचा योग्य विनियोग गावाच्या विकासासाठीच होईल याची खात्री मिळते. सरकारच्या या धोरणात्मक आणि दूरगामी निर्णयामुळे ग्रामीण भागातील सार्वजनिक सोयी-सुविधांचा दर्जा उंचावून शहरे आणि गावांमधील विकासाची दरी कमी होण्यास निश्चितच मदत होईल.

## रुग्णांच्या नातेवाईकांचे हाल थांबणार

**मुंबई :** दुर्गम तसेच ग्रामीण भागातून मुंबई, पुण्यासारख्या मोठ्या शहरांतील शासकीय रुग्णालयांमध्ये उपचारासाठी येणाऱ्या गरीब रुग्णांच्या कुटुंबीयांची निवासासाठी होणारी वणवण आता थांबणार आहे. मुंबईतील जे. जे. आणि पुण्याच्या ससून रुग्णालयांसह राज्यातील सहा प्रमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांच्या आवारात रुग्णांच्या नातेवाइकांसाठी लवकरच सुसज्ज धर्मशाळा आणि विश्रांतीगृहे उभारली जाणार आहेत. वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाने सोमवारी या संदर्भातील शासन निर्णय जारी केला.

अहमदाबाद येथील 'सेवादान आरोग्य फाऊंडेशन' या सेवाभावी संस्थेच्या माध्यमातून हे प्रकल्प राबवले जाणार आहेत. गुजरात, उत्तर प्रदेश, आसाम, उत्तराखंड, छत्तीसगड आणि राजस्थान या राज्यांतील शासकीय रुग्णालयांमध्ये असे प्रकल्प यशस्वीरित्या चालवणाऱ्या या संस्थेमार्फत महाराष्ट्रातही खर्चाची वसुली आणि 'ना नफा - ना तोटा' तत्त्वावर या धर्मशाळांचे व्यवस्थापन केले जाईल.(Breking News)

शासन निर्णयानुसार पहिल्या टप्प्यात राज्यातील ६ महत्त्वाच्या वैद्यकीय महाविद्यालयांच्या आवारात या सुसज्ज धर्मशाळा उभारल्या जातील. यात सर ग्रँट शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर जे. जे. समूह रुग्णालय मुंबई, बी. जे. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व ससून सर्वोपचार रुग्णालय पुणे, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय नागपूर, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय छत्रपती संभाजीनगर, वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय यवतमाळ, छत्रपती प्रमिलाराजे सर्वोपचार रुग्णालय कोल्हापूर आदी रुग्णालयांचा समावेश आहे.

**१ रुपयात जमीन, ४९ वर्षांचा करार :** या प्रकल्पासाठी राज्य सरकारने लवचिक धोरण स्वीकारले आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या नियमांनुसार प्रस्तावित विश्रामगृहाच्या बांधकामासाठी आवश्यक असलेली शासकीय जमीन संबंधित संस्थेला अवघ्या १ रुपया प्रति वर्ष या नाममात्र भुईभाड्याने दिली जाणार आहे. हा भाडेपट्टा सुरुवातीला ४९ वर्षांच्या कालावधीसाठी असेल. मात्र, जमिनीची मूळ मालकी, ताबा आणि नियंत्रण पूर्णपणे महाराष्ट्र शासनाकडेच राहील, अशी अट घालण्यात आली आहे. - या प्रकल्पासाठी आवश्यक असलेला संपूर्ण भांडवली खर्च, इमारत बांधकाम, सुसज्जीकरण, २४ तास सुरक्षा, स्वच्छता, मनुष्यबळ आणि विमा संरक्षण या सर्वांची आर्थिक व कायदेशीर जबाबदारी संबंधित संस्थेची असणार आहे. या धर्मशाळांमध्ये रुग्णांच्या नातेवाइकांना अतिशय वाजवी आणि परवडणाऱ्या दरात सुरक्षित निवास, स्वच्छतागृह, स्नानगृह, पिण्याचे शुद्ध पाणी आणि भोजन व्यवस्था उपलब्ध करून दिली जाईल. तसेच इमारतीचे बांधकाम सर्व परवानग्या मिळाल्यापासून २ वर्षांच्या आत पूर्ण करून ती कार्यान्वित करणे संस्थेला बंधनकारक राहील.

# राजेश खन्ना यांच्या अभिनेत्रीचा काळजाचा ठोका चुकवणारा अंत; एका रात्रीत संपले संपूर्ण कुटुंब!

**बॉलिवूडमध्ये मोठे नाव कमावण्याचे स्वप्न पाहणाऱ्या एका अभिनेत्रीसह तिच्या संपूर्ण कुटुंबाचे अस्तित्व अवघ्या एका रात्रीत संपवले जाईल, अशी सुतराम शक्यताही कोणी वर्तवली नसेल. चित्रपटसृष्टीतील ज्येष्ठ अभिनेते राजेश खन्ना यांच्यासोबत स्क्रिन शेअर करणारी अभिनेत्री लैला खान आणि तिच्या कुटुंबातील ५ सदस्यांची झालेली अत्यंत क्रूर हत्या हे देशातील एक अत्यंत भीषण हत्याकांड मानले जाते. तब्बल १७ महिने एका फार्महाऊसच्या जमिनीखाली गाडला गेलेला हा काळा थरार जेव्हा उजेडात आला, तेव्हा संपूर्ण देश हादरून गेला होता.**

हे खळबळजनक प्रकरण २०११ सालातील आहे. अभिनेत्री लैला खान मुंबईतील ओशिवरा परिसरात राहत होती. एके दिवशी लैला, तिची आई सेलिना आणि कुटुंबातील इतर ४ सदस्य अचानक रहस्यमयी रीतीने बेपत्ता झाले. लैला खानने २००८ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'वफा- ए डेडली लव्ह स्टोरी' या चित्रपटात राजेश खन्ना यांच्यासोबत काम केले होते. संपूर्ण कुटुंब अचानक गायब झाल्यामुळे विविध तर्कवितर्क लढवले जाऊ लागले. अखेर लैलाच्या वडिलांनी पोलीस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली, त्यानंतर मुंबई गुन्हे शाखेने या प्रकरणाचा सखोल तपास सुरू केला.



संशयाची सुई सावत्र वडिलांवर

मुंबई गुन्हे शाखेचे तत्कालीन अधिकारी अंबादास पोते यांनी या प्रकरणाच्या तपासाची धुरा सांभाळली होती. तपासादरम्यान पोलिसांना लैलाच्या मुंबईतील घरातून तिच्या सावत्र वडिलांचे, म्हणजेच परवेझ ताकचे ओळखपत्र हाती लागले. परवेझ ताक हा सेलिनाचा तिसरा पती होता. लैलाचे चित्रपटांमध्ये काम करणे परवेझला अजिबात मान्य नव्हते आणि त्यावरून कुटुंबात सतत मालमत्तेवरून वाद होत असत. परवेझने लैलाला कामासाठी दुबईला निघून जाण्याचा सल्ला दिला होता, जो तिने फेटाळून लावला होता. याच वादातून आणि रागातून परवेझने संपूर्ण कुटुंबाचा काटा काढण्याचा भयानक कट रचला.

इगतपुरीच्या फार्महाऊसवरील शेवटची पार्टी

परवेझने आधीच इगतपुरी येथील कुटुंबाच्या फार्महाऊसवर आपल्या एका ओळखीच्या व्यक्तीला सुरक्षारक्षक म्हणून नियुक्त केले होते. त्यानंतर त्याने संपूर्ण कुटुंबाला काही दिवस सुट्ट्या घालवण्यासाठी तिथे जाण्यास तयार केले. फार्महाऊसवर पोहोचल्यावर सर्वांनी एकत्र जेवण केले, आनंद साजरा केला आणि सर्वजण गाढ झोपेत गेले.

मात्र, मध्यरात्री परवेझ आणि त्याच्या साथीदाराने लोखंडी रॉड तसेच सुऱ्याच्या साहाय्याने संपूर्ण कुटुंबावर अचानक जीवघेणा हल्ला केला. लैलाचा भाऊ इम्रान याने कुटुंबाला वाचवण्याचा निकराचा प्रयत्न केला, परंतु नराधम परवेझने कोणाचीही दयामाया न दाखवता सर्वांची अत्यंत निर्घृण हत्या केली.

पुरावा नष्ट करण्यासाठी आखलेला थंड डोक्याचा कट

गुन्ह्याचा कोणताही माग किंवा पुरावा मागे लागू नये, यासाठी परवेझने अत्यंत थंड डोक्याने नियोजन केले होते. फार्महाऊसवर स्विमिंग पूलसाठी खोदण्यात आलेल्या एका मोठ्या खड्ड्यात त्याने सर्व ६ मृतदेह पुरले. सुरुवातीला ३ मृतदेह खाली ठेवून त्यावर गाद्या व उशा टाकल्या, आणि त्यानंतर उर्वरित ३ मृतदेह ठेवून तो खड्डा मातीने पूर्णपणे बुजून टाकला. पोलिसांची दिशाभूल करण्याच्या उद्देशाने त्याने कुटुंबाची एक कार थेट जम्मूमध्ये नेऊन लावली. अखेर पोलिसांनी जम्मू-काश्मीर पोलिसांच्या संयुक्त सहकार्याने त्याला बेड्या ठोकल्या.

१७ महिन्यांनंतर ते काळे सत्य उजेडात आले

अटकेनंतर कसून चौकशी केली असता परवेझने आपल्या गुन्ह्याची कबुली दिली. जेव्हा पोलीस इगतपुरीच्या फार्महाऊसवर पोहोचले, तेव्हा मुसळधार पावसामुळे खड्ड्यावरील माती काहीशी खचली होती. पोलिसांनी सलग ६ तास उत्खनन केल्यानंतर तिथून मानवी सांगाडे बाहेर काढले. वैद्यकीय तपासणीमध्ये ते सांगाडे लैला आणि तिच्या कुटुंबीयांचेच असल्याचे निष्पन्न झाले. तब्बल १७ महिने हा नरसंहार जगापासून पूर्णपणे लपून राहिला होता. तत्कालीन सहपोलीस आयुक्त हिमांशू रॉय यांनी परवेझ ताक हा अत्यंत चतुर आणि धोकादायक गुन्हेगार असल्याचे नमूद केले होते.

न्यायालयाचा ऐतिहासिक आणि कठोर निकाल

मुंबई सत्र न्यायालयाने या खळबळजनक प्रकरणाचा निकाल देत मुख्य आरोपी परवेझ ताक याला 'दुर्मिळातील दुर्मिळ' गुन्हा ठरवून फाशीची शिक्षा सुनावली. न्यायसंस्थेने स्पष्ट केले की, हे कृत्य अत्यंत क्रूर आणि समाजाच्या सद्सद्विवेकबुद्धीला वेठीस धरणारे होते. एवढ्या मोठ्या प्रमाणावर सामूहिक हत्या करून १७ महिन्यांपर्यंत पुरावे लपवून ठेवणे हे आरोपीच्या गुन्हेगारी मानसिकतेचे प्रतीक आहे. या संपूर्ण हत्याकांडात परवेझला मदत करणारा त्याचा सहआरोपी अजूनही फरार असून पोलीस त्याचा कसून शोध घेत आहेत.

## बी.एस्सी. (ऑनर्स) सामुदायिक विज्ञान : शिक्षण, रोजगार आणि उद्योजकतेचा सर्वसमावेशक अभ्यासक्रम

# कृषि विद्यापीठातील सामुदायिक विज्ञान अभ्यासक्रम

बारावी उत्तीर्ण झाल्यानंतर विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील सर्वात महत्त्वाचा टप्पा म्हणजे पुढील शिक्षणासाठी योग्य अभ्यासक्रमाची निवड होय. आजच्या स्पर्धात्मक आणि वेगाने बदलणाऱ्या शैक्षणिक व रोजगाराच्या युगात विद्यार्थ्यांसमोर विविध शाखांतील असंख्य अभ्यासक्रमांचे पर्याय उपलब्ध आहेत. त्यामुळे केवळ पारंपरिक विचारांवर किंवा इतरांच्या सल्ल्यावर अवलंबून न राहता विद्यार्थ्यांची आवड, क्षमता, कौशल्ये, करिअरच्या संधी आणि भविष्यातील रोजगारक्षमतेचा सर्वांगीण विचार करूनच अभ्यासक्रमाची निवड करणे आवश्यक आहे.

नवीन शैक्षणिक वर्षास प्रारंभ झाल्याने पालक आणि विद्यार्थ्यांची विविध शाळा व महाविद्यालयांमध्ये प्रवेश घेण्यासाठी लगबग सुरू झाली आहे. अशा परिस्थितीत योग्य माहिती, तज्ज्ञांचे मार्गदर्शन आणि दूरदृष्टी यांच्या आधारे घेतलेला निर्णय विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भवितव्याचा मजबूत पाया ठरू शकतो. त्यामुळे प्रवेश प्रक्रियेदरम्यान उपलब्ध अभ्यासक्रमांची वैशिष्ट्ये, त्यामधील करिअरच्या संधी आणि संबंधित क्षेत्रातील भविष्यातील मागणी यांचा सखोल अभ्यास करूनच अंतिम निर्णय घेणे हितावह ठरेल.

यामध्ये करिअरच्या नव्या संधी शोधणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी सामुदायिक विज्ञान (कम्युनिटी सायन्स) हा अभ्यासक्रम अत्यंत उपयुक्त असून त्याविषयीची माहिती पुढीलप्रमाणे आहे. महाराष्ट्रातील चार कृषि विद्यापीठांपैकी केवळ वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी येथे सामुदायिक विज्ञान हा अभ्यासक्रम उपलब्ध आहे. वैद्यकीय आणि अभियांत्रिकी अभ्यासक्रमांप्रमाणेच कृषि शिक्षणांतर्गत हा चार वर्षांचा व्यावसायिक पदवी अभ्यासक्रम आहे. इयत्ता १२ वी नंतर हा अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर विद्यार्थ्यांना बी.एस्सी. (ऑनर्स) कम्युनिटी सायन्स ही पदवी प्रदान केली जाते. सामान्य पदवीपेक्षा ऑनर्स पदवीला करिअरच्या दृष्टीने विशेष महत्त्व आहे.

कृषि विद्यापीठांमधील विविध पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रिया सुरू झाल्या असून महाराष्ट्र शासनाने सन २०२१ मध्ये शासन निर्णयाद्वारे सामुदायिक विज्ञान अभ्यासक्रमाला कृषि विद्यापीठातील इतर पदवी अभ्यासक्रमांप्रमाणेच समकक्ष दर्जा प्रदान केला आहे.

तसेच बी. एससी (ऑनर्स) गृह विज्ञान / बी.एससी (ऑनर्स) सामुदायिक विज्ञान ह्या दोन्ही पदव्या एकच असल्याबाबत महाराष्ट्र शासनाचा आदेश (जीआर) निर्गमित करण्यासाठी वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाने माननीय कुलगुरू प्रा. (डॉ.) इन्द्र मणि यांच्या मार्गदर्शनाखाली, महाराष्ट्र शासनाकडे पाठपुरावा केला. यामुळे महाराष्ट्र शासनाने माननीय राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने तसेच महाराष्ट्र शासनाच्या उपसचिव यांच्या स्वाक्षरीने आदेश दिनांक १३ फेब्रुवारी २०२५ रोजी (संगणक सांकेतांक क्रमांक २०२५०२१३१६०४४२९९०१) निर्गमीत केला. यामध्ये राज्यातील चारही कृषि विद्यापीठांतर्गत शिकविण्यात येणाऱ्या बी. एससी गृह विज्ञान / B.Sc. Home Science, बी.एससी (ऑनर्स) गृह विज्ञान / B.Sc. (Hons) Home Science / बी.एससी (ऑनर्स) सामुदायिक विज्ञान / B. Sc. (Hons) Community Science या सर्व अभ्यासक्रमांच्या पदव्या एकच असल्याने बी.एससी (गृह विज्ञान) / B.Sc. (Home Science) पदवी प्राप्त उमेदवारांना भरती प्रक्रिया प्रक्रियेत ज्या नोकरीच्या संधी




उपलब्ध होत्या, त्या बी. एससी (ऑनर्स) गृह विज्ञान / B.Sc. (Hons) Home Science व बी.एससी (ऑनर्स) सामुदायिक विज्ञान / B. Sc. (Hons) Community Science या पदवी प्राप्त विद्यार्थ्यांना उमेदवारांना उपलब्ध राहतील, असे नमूद केले आहे.

विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे, मुंबई येथील वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय (DMER) अंतर्गत वैद्यकीय शिक्षण, संशोधन व औषधी द्रव्ये विभागामार्फत आहारतज्ज्ञ (Dietitian) पदासाठी दिनांक २२ सप्टेंबर २०२५ रोजी संगणक-आधारित परीक्षा (Computer Based Test – CBT) पद्धतीने घेण्यात आलेल्या स्पर्धा परीक्षेत महाविद्यालयाच्या चार विद्यार्थिनींनी उल्लेखनीय यश संपादन करून आहारतज्ज्ञ (Dietitian) या प्रतिष्ठित पदावर निवड मिळविली आहे. तसेच योगेश्वरी सतिशराव पवार, जान्हवी रंगराव उक्कलगावकर आणि स्वाती बाळासाहेब पवार या तीन विद्यार्थिनींची प्रतीक्षा यादीत (Waiting List) निवड झाली आहे.

प्रवेशासाठी शैक्षणिक पात्रता

या अभ्यासक्रमासाठी विद्यार्थ्यांनी इयत्ता १२ वी (विज्ञान शाखा) किंवा तत्सम परीक्षा उत्तीर्ण केलेली असावी. तसेच सक्षम प्राधिकरणामार्फत आयोजित एमएचटी-सीईटी, जेईई किंवा नीट या प्रवेश परीक्षांपैकी कोणतीही परीक्षा दिलेली असणे आवश्यक आहे.

या अभ्यासक्रमासाठी मुला - मुली दोघांनाही प्रवेश खुला आहे. शासनाने जाहीर केलेल्या सर्व शिष्यवृत्ती योजनांचा लाभ पात्र विद्यार्थ्यांना मिळतो. तसेच शुल्कासंदर्भातील शासनाच्या सर्व सवलती या अभ्यासक्रमालाही लागू आहेत.

करिअरच्या विविध संधी

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार पूर्वप्राथमिक शिक्षणाचा शालेय शिक्षणात समावेश करण्यात आल्यामुळे या क्षेत्रातील तज्ज्ञांची मागणी वाढत आहे. सामुदायिक विज्ञान अभ्यासक्रमामध्ये पूर्वप्राथमिक शिक्षणाचे सखोल प्रशिक्षण दिले जात असल्याने विद्यार्थ्यांना या क्षेत्रात उत्कृष्ट करिअरच्या संधी उपलब्ध होतात.

याशिवाय जिल्हा रुग्णालये, दवाखाने, क्रीडा विभाग, व्यायामशाळा, केंद्रीय राखीव पोलीस दल (CRPF), रेल्वे विभाग तसेच विविध शासकीय व खासगी संस्थांमध्ये आहारतज्ज्ञ, महाराष्ट्र महिला व बाल विकास विभागातील अधिकारी, आयसीडीएस पर्यवेक्षक, प्राध्यापक, शिक्षक, प्रशिक्षक, प्रशासकीय अधिकारी, शास्त्रज्ञ, बिहेव्हिअर मॉडिफिकेशन थेरपिस्ट, सामाजिक कार्यकर्ते, बँका, भारतीय आयुर्विमा महामंडळ (LIC), इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक हेल्थ (IIPH), आयसीएमआर-एनआयएन (ICMR-NIN) आदी संस्थांमध्ये रोजगाराच्या भरपूर संधी उपलब्ध आहेत.

उद्योजकतेच्या संधी

स्किल इंडिया मिशनला अनुसरून या अभ्यासक्रमामध्ये स्टार्टअप आणि स्वयंरोजगारालाही विशेष प्रोत्साहन दिले जाते. विद्यार्थ्यांना स्वतःच्या दर्जेदार पूर्वप्राथमिक शाळा, पाळणाघरे, आहार सल्ला केंद्र, बाल मार्गदर्शन व समुपदेशन केंद्र, इंटेरिअर डिझाइनिंग, बेकरी व कन्फेक्शनरी युनिट, कॅन्टीन, मेस, बुटीक, हस्तकला (हँडीक्राफ्ट्स) युनिट, इव्हेंट मॅनेजमेंट, फॅशन डिझाइनिंग यांसारखे व्यवसाय सुरू करण्यासाठी सक्षम केले जाते.

तसेच अन्न प्रक्रिया व साठवणूक, हेल्थ क्लब, लँडस्केप प्लॅनिंग, फर्निचर डिझाइनिंग, निवासी व व्यावसायिक इमारती, दवाखाने, मॉल्स यांच्यासाठी गार्डन डिझाइनिंग, पुष्परचना, पुष्पगुच्छ निर्मिती, गिफ्ट पॅकेजिंग, इको-टुरिझम, बालकांसाठी शैक्षणिक साहित्य व खेळणी निर्मिती, हाऊसकीपिंग, पत्रकारिता, व्हिडिओग्राफी, कंपन्यांमधील पब्लिक रिलेशन ऑफिसर (PRO) तसेच मार्केटिंग यांसारख्या आधुनिक क्षेत्रांमध्येही करिअरच्या मोठ्या संधी उपलब्ध आहेत.

उच्च शिक्षण व नोकरीच्या संधी

या अभ्यासक्रमाचे पदवीधर एमबीए अभ्यासक्रमासाठी पात्र असून त्यांना नॅशनल अकॅडमी ऑफ ॲग्रिकल्चरल रिसर्च मॅनेजमेंट (NAARM) संस्थेच्या बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशन पदव्युत्तर अभ्यासक्रमामध्ये प्रवेश घेता येतो.

याशिवाय स्पेशल एज्युकेशन, स्पीच थेरपी, बाल व कौटुंबिक समुपदेशन, इंटेरिअर डिझाइनिंग, फॅशन डिझाइनिंग, स्कूल काउन्सेलिंग आदी विषयांतील पदविका अभ्यासक्रम पूर्ण करूनही विद्यार्थी यशस्वी करिअर घडवू शकतात.

या अभ्यासक्रमाचे पदवीधर एमपीएससी, यूपीएससी तसेच इतर स्पर्धा परीक्षांसाठीही पात्र आहेत. या महाविद्यालयातील अनेक माजी विद्यार्थ्यांनी विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय यश संपादन केले असून रोजगार आणि स्वयंरोजगाराच्या संधी दिवसेंदिवस वाढत आहेत.

स्वायत्त व आंतरराष्ट्रीय संस्थांमधील संधी

किशोर न्याय मंडळ (JJB), केंद्रीय समाजकल्याण मंडळ, राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (NCERT), राष्ट्रीय सहकार्य व बालविकास संस्था (NIPCCD), युनिसेफ (UNICEF), युएनडीपी (UNDP), युएसडी, एफएओ (FAO) आणि जागतिक आरोग्य संघटना (WHO) यांसारख्या राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय संस्थांमध्येही सामुदायिक विज्ञान पदवीधरांसाठी करिअरच्या विविध संधी उपलब्ध आहेत.

विद्यार्थी आणि पालकांनी या अभ्यासक्रमाची व्यापक व्याप्ती, रोजगारक्षमतेच्या संधी आणि स्वयंरोजगाराच्या क्षमता लक्षात घेऊन या अभ्यासक्रमाचा अवश्य लाभ घ्यावा.

**प्रवेशासंबंधी अधिक माहितीसाठी : https://** cetcell.mahacet.org/cap_2026-27 www.mcaer.org

डॉ. नीता गायकवाड, सहयोगी अधिष्ठाता व प्राचार्य, भ्रमणध्वनी - ७७७४८४१६४९

डॉ. शंकर पुरी, विषय प्रमुख, भ्रमणध्वनी - ९३२६१०६०३६


सामुदायिक विज्ञान महाविद्यालय, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी

# विशेष सखोल पुनरीक्षण (SIR) मोहिमेत गंगाखेड उपविभागाची राज्यात नव्या क्रमांकावर तर छत्रपती संभाजीनगर विभागात प्रथम क्रमांकाचे उल्लेखनी कामगिरी.

**हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी.**

**परभणी:** भारत निवडणूक आयोगाच्या विशेष सखोल पुनर्नरीक्षण(SIR ) या मोहिमेत गंगाखेड विभागाने राज्यात नववा तर छत्रपती संभाजी नगर विभागात प्रथम क्रमांक पटकावत उल्लेखनीय संपादन केले आहे ही कामगिरी मतदार गणना पत्रकाचे वितरण डीजे डायजेशन व नियोजनबद्ध अमलबजावणीच्या बळावर परभणी जिल्ह्याच्या निवडणूक यंत्रणेच्या कार्यक्षमतेची राज्यभर दखल घेतली जात आहे.

या यशाच्या मागे उपविभागीय अधिकारी तथा मतदार नोंदणी अधिकारी श्री युवराज डापकर यांचे दूरदृष्टी पूर्ण नेतृत्व आणि काटेकोर अंमलबजावणी हे प्रमुख आधारस्तंभ ठरले आहे त्यांनी प्रत्येक अधिकारी व कर्मचाऱ्यांचे सातत्याने समन्वय साधत संपूर्ण यंत्रणेला एकजुटीने काम करण्यास प्रेरित केले असून परिणामी गंगाखेड उपविभागाने राज्यात मानाचे स्थान मिळवले आहे.



या उल्लेखनीय अशा मागे जिल्हास्तरावरील सक्षम नेतृत्व सातत्याने मार्गदर्शन चा मोठा वाटा आहे जिल्हाधिकारी तथा निवडणूक अधिकारी माननीय संजय सिंहजी चव्हाण यांच्या प्रभावी नेतृत्वाखाली संपूर्ण एस आय आर मोहिमेची वेळोवेळी नियोजन व सतत आढावा आवश्यक मार्गदर्शन आणि प्रेरणादायी सूचना देण्यात आल्या तसेच उपजिल्हा निवडणूक अधिकारी श्रीमती अरुणा संगेवार यांनी जिल्हास्तरावर सातत्यपूर्ण समन्वय प्रभावी नियोजन आणि तांत्रिक मार्गदर्शन आणि प्रत्येक टप्प्यावर आवश्यक सहाय्यक उपलब्ध करून तेच संपूर्ण निवडणूक यंत्रणाला प्रेरित केले त्यांच्या या मार्गदर्शनामुळे जिल्ह्यात सर्व विभागाने कामाला गती मिळाली असून गुणवत्तापूर्ण अंमलबजावणी शक्य झाली याचबरोबर जिल्हा निवडणूक शाखेतील अधिकारी व कर्मचारी आणि सातत्याने पाठपुरावा करून समन्वय आणि आवश्यक सहकार्य करत गंगाखेड विभागाच्या यशामध्ये मौलाची कामगिरी बजावली आहे.

यावलग्रेशामध्ये गंगाखेड चे सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी तथा तहसीलदार श्रीमती उषा किरण शृंगारे पालमचे सहायक मतदार नोंदणी अधिकारी तथा तहसीलदार श्री कैलास चंद्र वाघमारे तसेच पूर्ण सहाय्यक मतदार संघ नोंदणी अधिकारी तथा तहसीलदार माधवराव गोतीकर यांनी आपापल्या तालुक्यामध्ये उत्कृष्ट नियोजन सातत्यपूर्ण पाठपुरावा आणि प्रभावी नेतृत्व करत मोलाचे योगदान दिले आहे.

तसेच एस आय आर मोहिमेत गंगाखेड उपयोगात नियुक्त करण्यात आलेले विविध विभागाचे सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी मतदान केंद्रीय स्तरावरील अधिकारी सुपरवायझर बीएलओ बीएलओ सुपरवायझर तलाठी तहसील कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी तसेच विभागातील अधिकारी कर्मचाऱ्यांनी दिवस-रात्र परिश्रम घेऊन ही मोहीम यशस्वी केली. विशेष उल्लेखनी बाब म्हणजे मतदान केंद्रस्तरीय अधिकारी बीएलओ यांनी घराघरात जाऊन मतदाराशी थेट संपर्क साधला व गणना पत्रकाचे वितरण आवश्यक कागदपत्राची पूर्तता मतदाराचे प्रबोधन आणि डिजिटलायझेशन प्रक्रिया अत्यंत जबाबदारीने पूर्ण केली यांच्या अतक परिसरामुळे गंगाखेड उपविभागाला राज्यात नववा आणि छत्रपती संभाजी नगर विभागात प्रथम क्रमांक मिळवण्याचा मान प्राप्त झाला आहे.

ही कामगिरी केवळ एखाद्या व्यक्तीची नसून संपूर्ण निवडणूक यंत्रणेच्या एकजुटीची व समर्पणाचे आणि कर्तव्यनिष्ठ साक्ष आहे. जिल्हा स्तरापासून उपविभाग तालुका आणि मतदान केंद्र स्तरापर्यंत प्रत्येक अधिकारी व कर्मचाऱ्यांनी संघ भावनेने केलेल्या या कार्यामुळे हे यश शक्य झाले आहे.

दैनिक
# हिंदू प्रकाशवार्ता
सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी



## विद्यापीठ नामांतर शहीद स्मारकाचे निकृष्ट बांधकाम पाडा; अन्यथा तीव्र आंदोलन!

### भ्रष्टाचार उघडकीस आणणाऱ्या कार्यकर्त्याला पिस्तुल दाखवून जिवे मारण्याची धमकी, आंबेडकरी संघटना आक्रमक;

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या गेट बाजूला शासनाच्या निधीतून उभारण्यात येत असलेल्या नामांतर शहीद स्मारकाचे काम अत्यंत निकृष्ठ दर्जाचे झाले असून, हे संपूर्ण बांधकाम पाडून नवीन मजबूत बांधकाम करावे, अशी मागणी सर्वपक्षीय आंबेडकरवादी संघटना व आंबेडकरवादी बहुजन विकास समितीच्या वतीने करण्यात आली आहे. या संदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधीक्षक अभियंत्यांना गुरुवारी (दि. २०) जाहीर निवेदन देण्यात आले. तसेच, संबंधित दोषी ठेकेदार व अधिकाऱ्यांवर कायदेशीर कडक कारवाई न झाल्यास रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला आहे. नामांतर आंदोलनातील शहिदांच्या व भीमसैनिकांच्या त्यागाचे प्रतीक



म्हणून हे स्मारक उभारण्यासाठी आंबेडकरी चळवळीने मोठा लढा दिला होता. त्यानंतर गेल्या चार वर्षांपासून विद्यापीठ परिसरात या स्मारकाचे काम संथ गतीने सुरू आहे. संबंधित शासकीय ठेकेदार प्रियंका रोहित नावंदर व बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांकडून हे काम निकृष्ठ दर्जाचे होत असल्याबाबत संघटनांनी वेळोवेळी निवेदने दिली होती. मात्र, याकडे जाणीवपूर्वक कानाडोळा करून मोठा भ्रष्टाचार करण्यात आल्याचा आरोप संघटनांनी केला आहे. या भ्रष्टाचाराच्या विरोधात आंबेडकरी चळवळीचे कार्यकर्ते राहुल वडमारे यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू केले होते. त्यानंतर अधिकाऱ्यांनी स्मारकाची संयुक्त पाहणी केली असता, काम निकृष्ठ दर्जाचे झाल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार २९ जून २०२६ रोजी कार्यकारी अभियंत्यांनी हे निकृष्ठ बांधकाम पाडून नव्याने मजबूत काम करण्याचे शासकीय पत्र ठेकेदाराला बजावले होते. निवेदन देतेवेळी दीपक निकाळजे, अरविंद कांबळे, अमित वाहूळ, प्रांतोष वाघमारे, सचिन निकम, राहुल वडमारे, राकेश कांबळे, नागेश केदारे, पवन पवार, मिलिंद दाभाडे, सचिन जोगदंड, सोनू नरवडे, कपिल बनकर, नंदू साळवे, जयश्री शिरके, सॅडी गुरु, संगीता जाधव, सतीश सुरडकर, प्रताप मोरे, रतन जाधव, अमोल गडवे, बंडू तांदळे यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते.

> **"या निकृष्ठ कामामुळे देशातील समस्त आंबेडकरी व संविधानवादी समाजाच्या भावना दुखावल्या गेल्या आहेत. ऐतिहासिक विद्यापीठ आणि भीमसैनिकांची बदनामी करणाऱ्या बोगस ठेकेदार व अधिकाऱ्यांवर तातडीने फौजदारी गुन्हे दाखल करावेत, अन्यथा विद्यापीठासमोर लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल."**
>
> **दीपक निकाळजे**
> **— आंबेडकरी समन्वय समिती**

**पिस्तुल दाखवून कार्यकर्त्याला जिवे मारण्याची धमकी :**


शासकीय आदेश असतानाही, संबंधित ठेकेदार काही अधिकाऱ्यांना हाताशी धरून केवळ काही भाग पाडून उर्वरित काम चांगले असल्याचे दर्शवण्याचा प्रयत्न करत आहे. धक्कादायक बाब म्हणजे, हा भ्रष्टाचार जनआंदोलनातून समोर आणणारे राहुल वडमारे यांना संबंधित ठेकेदाराचा पती रोहित नावंदर आणि अजहर बाबर कुरेशी यांनी 'कामात अडथळा का आणतो?' असे म्हणत कमरेला लावलेली पिस्तुल दाखवून जिवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे.

## जिल्हा परिषदेत महापुरुषांचा अवमान!

### सुशोभीकरणाच्या नावाखाली महापुरुषांचे फोटो कचऱ्यात

हिंदू प्रकाशवार्ता : सिद्धेश्वर थोर

**छत्रपती संभाजीनगर :** शिक्षण, सामाजिक न्याय आणि राष्ट्रनिर्मितीची प्रेरणा देणाऱ्या राजर्षी शाहू महाराज तसेच भारताचे माजी राष्ट्रपती व शिक्षणतज्ज्ञ डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमा जिल्हा परिषदेच्या परिसरात कचऱ्याच्या ढिगाऱ्यात पडलेल्या आढळल्याने संतापाची लाट उसळली आहे. धक्कादायक म्हणजे हा प्रकार जिल्हा परिषद अध्यक्ष अविनाश गलांडे यांच्या कार्यालयालगतच उघडकीस आला. त्यामुळे जिल्हा परिषद प्रशासनाच्या संवेदनशीलतेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून महापुरुषांप्रतीचा हा अनादर असल्याची तीव्र भावना व्यक्त होत आहे.



जिल्हा परिषदेच्या जुन्या इमारतीचे सुशोभीकरण आणि रंगरंगोटीचे काम नुकतेच करण्यात आले. या कामादरम्यान जुन्या साहित्याची विल्हेवाट लावताना राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमा इतर टाकाऊ वस्तूंसह कचऱ्यात फेकल्याचे चित्र समोर आले. महापुरुषांच्या प्रतिमा सन्मानाने जतन करण्याऐवजी त्यांची अशी अवमानकारक विल्हेवाट लावल्याने प्रशासनाच्या निष्काळजी कारभारावर प्रश्न उपस्थित होत आहेत.

राजर्षी शाहू महाराज यांनी शिक्षण सर्वसामान्यांच्या दारापर्यंत पोहोचवण्यासाठी आयुष्य वेचले. मागासवर्गीयांसाठी शिक्षणाची दारे खुली केली, मोफत शिक्षण, वसतिगृहे, शिष्यवृत्ती आणि आरक्षणासारखे ऐतिहासिक निर्णय घेऊन सामाजिक न्यायाची भक्कम पायाभरणी केली. आज शिक्षणातील समतेची संकल्पना त्यांच्या कार्यामुळेच अधिक बळकट झाली आहे.

डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांनी शिक्षक हा समाजाचा शिल्पकार असल्याचा विचार देशाला दिला. त्यांच्या जन्मदिनी देशभर शिक्षक दिन साजरा केला जातो. शिक्षण, संस्कार आणि मूल्याधिष्ठित समाजरचनेचा संदेश त्यांनी दिला. अशा दोन महान विभूतींच्या प्रतिमा कचऱ्यात पडलेल्या दिसणे ही अत्यंत वेदनादायी बाब असल्याची प्रतिक्रिया नागरिक व्यक्त करत आहेत.

विशेष म्हणजे हा प्रकार अध्यक्षांच्या कार्यालयाच्या शेजारीच घडत असताना तो कोणाच्याही निदर्शनास आला नाही का? महापुरुषांच्या प्रतिमा कचऱ्यात टाकण्याचा निर्णय कोणी घेतला? संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कारवाई होणार का? असे प्रश्न उपस्थित होत आहेत.

महापुरुषांच्या विचारांचा वारसा जपण्याच्या घोषणा करणाऱ्या प्रशासनाकडून प्रत्यक्षात त्यांच्या प्रतिमांचाच अवमान होत असेल, तर तो समाजासाठी अत्यंत गंभीर संदेश असल्याची भावना व्यक्त होत आहे. या प्रकरणाची तातडीने चौकशी करून संबंधितांवर कठोर कारवाई करावी, कचऱ्यात टाकलेल्या प्रतिमा तात्काळ सन्मानपूर्वक सुरक्षित ठिकाणी ठेवाव्यात आणि भविष्यात अशा प्रकारची घटना पुन्हा घडणार नाही यासाठी स्पष्ट कार्यपद्धती जाहीर करावी.

## स्थानिक गुन्हे शाखा ने पकडला सात लाखाचा गुटखा एकूण 21 लाख 50 हजार चा मुद्देमाल जप्त

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी.

**परभणी :-** स्थानिक गुन्हे शाखेच्या विशेष पथकाने गस्त घालत असताना त्यांना एक वाहन संशयितरित्या असल्याचे या पथकाने त्या वाहनाचा पाठलाग केला त्यावेळी त्या गाडीचा वाहन चालक गाडी सोडून पळून गेला सदर वाहनांमध्ये साडेसात लाख रुपये किमतीचा प्रतिबंधित गुटखा होता.. 20 जुलै रोजी मध्ये रात्रीच्या सुमारास पुण्यातील ताडकळस पॉइंट येथे केलेल्या कारवाईत एकूण 21 लाख 50 हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त



करण्यात आला असून पूर्ण परिसरात गुन्हा दाखल करण्यात आला. आहे.

सदरील ही कारवाई स्थानिक गुन्हा शाखेचे गजेंद्र सरोदे पोलीस उपनिरीक्षक अर्जुन टरके पोलीस अंमलदार यशवंत वाघमारे गोविंद चुडावकर सूर्यकांत ताटी कुंडलवार लिंबाजी वावळे रंगनाथ दुधाटे महेश कोठारे भदर्गे दीपक मुद्देराज गजानन शिरसागर हनुमान ढगे सूर्यकांत सातपुते यांचे पथक पूर्णा पोलीस ठाणे हद्दीत गस्त घालत होते यावेळी राजमुद्रा चौक येथे आल्यानंतर नांदेड येथून एम एच तेवीस ए एस ६७८६ या क्रमांकाच्या पांढऱ्या रंगाच्या स्कार्पिओ वाहनात सय्यद हुसेन सय्यद अली सय्यद गौस सय्यद अली हे गुटक्याची चोरटी विक्री करण्याच्या उद्देशाने वाहतूक करत असल्याची माहिती मिळाली. यावेळी पोलिसांनी ताडकलस टी -पॉइंट येथे सदर वाहन थांबविले यावेळी गाडी चालक सय्यद हुसेन यांनी गाडी पुन्हा नांदेडच्या दिशेने पळविली मग पथकाचा संशय बळकवल्याने त्यांनी त्या वाहनाचा पाठलाग केला काही अंतरावर गाडी सोडून संबंधित ड्रायव्हर पळून गेला या वाहनांमध्ये साडेसात लाख रुपये किमतीचा गोवा गुटखा होता व वाहनासह 21 लाख 50 हजाराचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे चंदनसिंह परिहार यांच्या फिर्यादीवरून सय्यद हुसेन सय्यद अली सय्यद गौस सय्यद अली पूर्णा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## परभणीत 22 जुलैला 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर'

### विविध योजनांच्या लाभांचे वितरण

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी.

**परभणी :** महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा जन्म दिन व दिवंगत माजी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे जयंती निमीत्य महाराष्ट्र शासनाच्यावतीने परभणी विधानसभा मतदारसंघ अतंर्गत छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीराचे आयोजन दि.२२ जुलै २०२६ रोजी "अश्वमेध" क्रिडा मैदान जवळ "दिक्षांत समारंभ सभागृह" वसंतराव नाईक मराठवाडा विद्यापीठ, परभणी येथे आयोजीत केले आहे.

सदर शिबीरासाठी महिला बाल विकास विभाग, विभागीय वन अधिकारी कार्यालय, परभणी, शालेय शिक्षण विभाग, पोलीस विभाग, पशुसंवर्धन विभाग, भुमी अभिलेख विभाग, महिला बचत गट / महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, पंचायत समिती घरकुल व ग्रामविकास विभाग, दस्त नोंदणी व मुद्रांक विभाग, कृषी विभाग, महिला व बालविकास विभाग, संजय गांधी निराधार विभाग तहसिल कार्यालय, परभणी, पुरवठा विभाग तहसिल कार्यालय, परभणी या विभागातील लाभार्थी यांना लाभ वितरीत करणे तसेच शिल्हा शासकीय रुग्णालय, परभणी आरोग्य विभाग पंचायत समीती, आरोग्य विभाग महारनगपालीका परभणी यांचे वतीने आरोग्य तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे नागरीकांना आरोग्य विषयक आयुष्मान भारत कार्डचे वाटप करण्यात येणार आहे.

तसेच विविध विभागातील योजने संबंधीत विभागाच्या वतीने अर्ज व प्रस्ताव स्विकारण्यात येणार आहेत तरी तालुक्यातील नागरीक यांनी सदर शिबीराचे ठिकाणी उपस्थीत राहून शिबीराचा लाभ घ्यावा असे आवाहन तहसिलदार संदीप राजपुरे यांनी केले आहे.

## स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त 22 जुलै रोजी घाटी रुग्णालयात दिव्यांग बांधवांसाठी समाजोपयोगी उपक्रम

**छत्रपती संभाजीनगर | प्रतिनिधी :** राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश सरचिटणीस आमेर जेतपुरवाला यांच्या वतीने स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त दरवर्षीप्रमाणे यंदाही दिव्यांग बांधवांसाठी विविध समाजोपयोगी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. बुधवार, दि. २२ जुलै रोजी घाटी रुग्णालयात हा विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

या उपक्रमांतर्गत दिव्यांग बांधवांना त्यांच्या गरजेनुसार व्हीलचेअर, वॉकर, काठ्या तसेच इतर आवश्यक सहाय्यक साहित्याचे वाटप करण्यात येणार आहे. तसेच पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर नागरिकांना छत्री वाटप करण्यात येणार असून, उपस्थितांसाठी अन्नदानाचा कार्यक्रमही आयोजित करण्यात आला आहे.

या कार्यक्रमाचे उद्घाटन छत्रपती संभाजीनगर पदवीधर मतदारसंघाचे आमदार सतीश चव्हाण यांच्या शुभहस्ते होणार आहे. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष अभिजीत भैय्या देशमुख, शहर कार्याध्यक्ष शेख कय्यूम अहमद, युवक शहराध्यक्ष डॉ. मयुर सोनवणे यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते व विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार आहेत.


दिव्यांग बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या समाजोपयोगी उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहर कार्याध्यक्ष शेख कय्यूम अहमद यांनी केले आहे. गरजू दिव्यांग बांधवांना आवश्यक सहाय्यक साहित्य मिळावे, या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाचा जास्तीत जास्त दिव्यांग बांधवांनी लाभ घ्यावा, असेही त्यांनी सांगितले.

समाजातील गरजू व दिव्यांग बांधवांना आधार देण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाचा लाभ घेण्यासाठी दिव्यांग बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

## प्रत्येकाने घरोघरी राज्य माता गोमाता पूजन करा : नितीन जाधव

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**परभणी:-**गौरक्षक सेना - स्व छगन आप्पा जाधव गोसंवर्धन चॅरिटेबल ट्रस्ट परभणी च्या वतीने शुद्ध देशी गोवंश जतन गोसंवर्धन दिन निमित्ताने प्रत्येकाने घरोघरी राज्य माता गोमाता चे पूजन करा तसेच नाहीतर गोमाता प्रतिमेचे पूजन गाईच्या मूर्तीचे पूजन करा दिनांक 22 जुलै 2026 रोजी शुद्ध देशी गोवंश जतन गो संवर्धन दिन महोत्सव गोमातेचा कृतज्ञ व्यक्त करण्यासाठी महाराष्ट्र राज्याच्या पशुसंवर्धन विभागाच्या कॅबिनेट मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या मार्गदर्शनानुसार महाराष्ट्र राज्याचे गोसेवा आयोगाचे अध्यक्ष शिखरजी मुंदडा यांच्या पुढाकारातून आणि राज्य माता गोमाता गोसंवाद यात्रा मुख्य



सारथी इंजिनीयर नितीन भैय्या चिलवंत यांच्या सल्ल्यानुसार यांनी आव्हानाला प्रतिसाद म्हणून प्रत्येक नागरिकांनी आपापल्या घरोघरी गाय पूजन गोमाता प्रतिमा पूजन करा असे आव्हान गौरक्षक सेना मराठवाडा अध्यक्ष व सेवक नितीन जाधव गोगलगावकर यांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून आव्हान केले आहे गाय गोमाता वाचली पाहिजे गोमातेचे संरक्षण झाले पाहिजे गोमातेच्या दूध दही ताक तूप गोमूत्र शेण पंच अमृत गौर्या अगरबत्ती धूप मंजन कोणापासून बनवलेल्या सर्व आरोग्यासाठी चांगला प्रचार प्रसार होण्यासाठी गोमाता बचाव गोमाता संवर्धन यासाठी प्रत्येक नागरिकांनी पूजाअर्चा गोमाता संवाद करा जय गोमाता जय नंदी महाराज जय गोवंश जय भारत माता अशी स्व. छगन आप्पा जाधव गोसंवर्धन चॅरिटेबल ट्रस्ट परभणीचे अध्यक्ष गोसेवक नितीन जाधव गोगलगावकर यांनी पत्रकार द्वारे माहिती दिली

## समर्पण फाउंडेशनच्या पुढाकाराने २२ जुलै रोजी सोयगावात भव्य मोफत महाआरोग्य शिबीर

### 50 लाखांपर्यंतच्या गंभीर आजारांवर मोफत निदान व उपचारासाठी मार्गदर्शन

हिंदू प्रकाशवार्ता/प्रतिनिधी

**सोयगाव,दि.२० जुलै :** सामान्य नागरिकांना दर्जेदार आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने टीम समर्पण फाउंडेशन आणि मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मदाय रुग्णालय मदत कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने,महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त बुधवार, दि.२२ जुलै २०२६ रोजी ग्रामीण रुग्णालय,सोयगाव येथे भव्य मोफत महाआरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

हे शिबीर सकाळी ९ ते सायंकाळी ५ या वेळेत होणार असून,नागरिकांना तज्ज्ञ डॉक्टरांकडून मोफत आरोग्य तपासणी,आवश्यकतेनुसार मोफत औषधे,ईसीजी,रक्तदाब, रक्तातील साखर,नेत्र, दंत,कान-नाक-घसा,हृदयरोग,किडनी, कर्करोग,अस्थिरोग,फिजिओथेरपी,मानसिक आरोग्य तसेच आयुर्वेदिक व होमिओपॅथिक सल्ला अशा विविध सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. याशिवाय जनरल मेडिसिन,जनरल सर्जरी,बालरोग, अस्थिरोग, हृदयरोग, स्त्रीरोग, त्वचारोग, नेत्ररोग, दंत, कान-नाक-घसा,मूत्रपिंड, कर्करोग,फिजिओथेरपी, मानसिक आरोग्य, आयुर्वेद आणि होमिओपॅथी या विविध शाखांतील तज्ज्ञ डॉक्टर नागरिकांची तपासणी करून मार्गदर्शन करणार आहेत.या महाआरोग्य शिबिराचे प्रमुख आकर्षण म्हणजे ५० लाखांपर्यंतच्या गंभीर आजारांवर मोफत निदान व उपचारासाठी मार्गदर्शन,तसेच ५६ प्रकारच्या रक्त तपासण्या आणि तज्ज्ञ डॉक्टरांकडून रोगनिदानाची सुविधा उपलब्ध होणार आहे. आर्थिक अडचणीमुळे उपचारापासून वंचित राहणाऱ्या गरजू रुग्णांसाठी हे शिबीर अत्यंत उपयुक्त ठरणार आहे.याबाबत टीम समर्पण फाउंडेशनच्या वतीने सांगण्यात आले की, "समाजातील कोणताही रुग्ण केवळ आर्थिक अडचणीमुळे उपचारापासून वंचित राहू नये, हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश आहे. सोयगाव तालुक्यातील सर्व नागरिकांनी,विशेषतः ज्येष्ठ नागरिक,महिला, शेतकरी, कामगार आणि गरजू रुग्णांनी या महाआरोग्य शिबिराचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा. तसेच ही माहिती आपल्या नातेवाईक, मित्रपरिवार आणि गरजू रुग्णांपर्यंत अवश्य पोहोचवावी.

## भारतीय जनता पार्टीचे अल्पसंख्याक मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष इद्रिस मुलतानी यानी सावळदबारा प. स. गणातील कार्यकर्त्यांची बैठक घेतली



**सावळदबारा प्रतिनिधी :** भारतीय जनता पार्टीचे अल्पसंख्याक मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष इद्रिस मुलतानी यानी सावळदबारा प. स. गणातील कार्यकर्त्यांची बैठक घेतली. सावळदबारा येथे या बैठकीत त्यांनी पक्ष संघटना बळकटीकरण, आगामी कार्यक्रम तसेच विविध विषयांवर सविस्तर मार्गदर्शन केले.यावेळी इद्रिस मुलतानी यानी शासनाच्या विविध योजनांची माहिती दिली बैठकीदरम्यान कार्यकर्त्यांशी संवाद साधत त्यांनी सावळदबारासह परिसरातील स्थानिक प्रश्नांबाबत माहिती जाणून घेतली.

इद्रिस मुलतानी यानी विविध योजनाची माहिती दिली आहेत यावेळी सोयगाव तालुका अध्यक्ष सजय पाटील, व्हिजेएटीचे प्रदेश उपाध्यक्ष जयप्रकाश चव्हाण, जिल्हा चिटणीस सुनिल गावडे,भाजपचे सोयगाव तालुका सरचिटणीस गुलाबराव पाटील कोलते,सभापती उत्तम चव्हाण,प. स. सदस्य राहुल राठोड, शिवाजी बुढाळ, गणेश लोखडे,भावराव कोलते, एन. आर कोलते, अनिल राठोड, लवकेश जाधव, वर्धन चव्हाण, प्रमोद पाटील,माजी सरपच आझसिग चव्हाण, सजय चव्हाण,प्रभाकर बडे, प्रदिप चव्हाण, रहिम पठाण, दिपक मानकर,मुकुदा गायकवाड, कैलास शेळके,गजानन चव्हाण,शाताराम खराटे, स्वराज डापके,अतुल चव्हाण, देव आप्पा पधाडे,बेल आप्पा पधाडे, एकनाथ सपाटे, आदी होते

## परभणीच्या श्रद्धास्थानाला विकासाची नवी दिशा!- पालकमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी.

**परभणी :-**गंगाखेड येथील श्री संत जनाबाई तीर्थक्षेत्राच्या सर्वांगीण विकासासाठी ₹४८.५५ कोटींच्या विकास आराखड्यास माननीय मुख्यमंत्री मा. देवेंद्रजी फडणवीस साहेब यांनी मंजुरी दिली, ही परभणी जिल्ह्यासाठी अत्यंत आनंदाची आणि अभिमानाची बाब आहे.



या आराखड्यामुळे सांस्कृतिक सभागृह, गोदावरी घाट विकास, दर्शन मंडप, उद्यान व सुशोभिकरण, पाथवे, मंदिर ते घाट सिमेंट काँक्रिट रस्ता, गोरक्षण इमारत, संरक्षण भिंती, जलनिस्सारण व्यवस्था, विद्युत सुविधा, सार्वजनिक स्वच्छतागृहे, सौरऊर्जा, सीसीटीव्ही, पिण्याचे पाणी आणि लँडस्केपिंग अशा अनेक विकासकामांमुळे भाविकांना अधिक दर्जेदार सुविधा उपलब्ध होणार आहेत.

संत जनाबाईंच्या पावन जन्मभूमीचा गौरव वाढविणारा हा निर्णय गंगाखेडला राज्याच्या धार्मिक पर्यटनाच्या नकाशावर अधिक भक्कम स्थान मिळवून देणारा ठरेल. महाराष्ट्राच्या संतपरंपरेचा वारसा जपत धार्मिक पर्यटनाला नवी दिशा देणाऱ्या या ऐतिहासिक निर्णयासाठी माननीय मुख्यमंत्री श्री देवेंद्रजी फडणवीस यांचे मनःपूर्वक आभार..!

## छत्रपती संभाजीनगर मध्ये उद्यापासून भव्य 'श्री नंदीश्वर महामंडल विधान' सोहळा



हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर : राजा बाजार येथील श्री १००८ खंडेलवाल दिगंबर जैन पंचायत पार्श्वनाथ मंदिरात २१ ते २९ जुलै दरम्यान भव्य व संगीतमय 'श्री नंदीश्वर महामंडल विधान' सोहळा आयोजित करण्यात आला आहे. अष्टान्हिका महापर्व व 'विनम्र चातुर्मास–२०२६' निमित्त परमपूज्य आचार्य भगवंत श्री १०८ विनम्रसागरजी गुरुदेव ससंघ यांच्या पावन सान्निध्यात हा सोहळा दररोज सकाळी ६:०० वाजता पार पडेल. जैन तत्त्वज्ञानानुसार अत्यंत पवित्र मानल्या जाणाऱ्या शाश्वत नंदीश्वर द्वीपावरील दिव्य आराधनेचे अनुकरण या विधानाव्दारे भूलोकावर केले जाते. हे पर्व आत्मशुद्धी आणि मोक्षमार्गाची प्रेरणा देणारे आहे. प्रतिष्ठाचार्य प्रदीप भैया यांच्या मार्गदर्शनाखाली मंत्रोच्चार आणि भक्तीमय वातावरणात हे धार्मिक विधी संपन्न होतील. या सोहळ्याचा शुभारंभ आज (२० जुलै) सकाळी ७:**३० वाजता पाटणी परिवाराच्या हस्ते (हीरा खानवाला) धर्मध्वजारोहणाने झाला. कार्यक्रमाची सुरुवात विश्वस्त अरुण पाटणी यांच्या मंगलाचरणाने आणि अध्यक्ष महावीर पाटणी यांच्या प्रास्ताविकाने झाली. याप्रसंगी आचार्य विनम्रसागरजी महाराजांनी "चांगल्या विचारसरणीमुळेच वेळही महत्त्वपूर्ण आणि चांगला बनतो" असा ओजस्वी संदेश दिला. शेवटी भगवान नेमिनाथ यांना निर्वाण लाडू अर्पण करून सांगता करण्यात आली. संयोजन समितीने सकल जैन भाविकांना या ऐतिहासिक सोहळ्याचा लाभ घेण्याचे आवाहन केले आहे.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी



# सोनम वांगचुक व नीट गैरव्यवहार प्रकरण: छत्रपती संभाजीनगरमध्ये आंदोलनांचा भडका!

## शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्यासाठी राष्ट्रवादी, डावी आघाडी आणि विद्यार्थ्यांचा क्रांती चौकात एल्गार; गांधी पुतळ्याजवळ लाक्षणिक उपोषण








हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर दिल्लीतील जंतर-मंतर येथे सुरू असलेल्या उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी, सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांना झालेल्या कथित बेकायदेशीर अटकेचा निषेध करण्यासाठी आणि 'नीट' (NEET) परीक्षेतील कथित गैरव्यवहाराविरोधात आज छत्रपती संभाजीनगर शहरात आंदोलकांचा एल्गार पाहायला मिळाला. शहरात सीजेपी (CJP) आणि सोनम वांगचुक यांच्या समर्थनार्थ विविध ठिकाणी विद्यार्थी संघटना, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) आणि डाव्या आघाडीच्या वतीने तीव्र आंदोलने करण्यात आली. या आंदोलनात माजी आमदार संजय वाघचौरे, प्रवक्ते भीमराव हत्तीअंभिरे, प्रकाश इंगळे, जिल्हाध्यक्ष पांडुरंग तांगडे पाटील, शहराध्यक्ष ख्वाजा शरपुद्दीन मुल्ला, शहर कार्याध्यक्ष आशिष पवार, विश्वजित चव्हाण, सुशील बोर्डे, अतुल गांवडे, भूषण तांबे, प्रशांत जगताप, आनंद मगरे, योगेश घुगे, हर्षल निकम आदींचा मोठा सहभाग होता.

**क्रांती चौकात विद्यार्थ्यांचे धरणे आंदोलन :**

दिल्लीतील संसद मार्च आणि आंदोलनाला जाहीर पाठिंबा देत शहरातील विद्यार्थ्यांनी क्रांती चौक येथे भव्य धरणे आंदोलन केले. दुपारी १२ वाजता सुरू झालेल्या या आंदोलनात शहरातील विविध महाविद्यालयांतील विद्यार्थी, विद्यार्थी संघटना आणि सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. आंदोलनादरम्यान विद्यार्थ्यांनी सोनम वांगचुक यांच्या समर्थनार्थ आणि केंद्र सरकारच्या भूमिकेचा तीव्र निषेध व्यक्त केला. नीट परीक्षेतील कथित पेपरफुटी आणि गैरव्यवहारामुळे लाखो विद्यार्थ्यांचे भवितव्य धोक्यात आले असून, या प्रकरणातील दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी विद्यार्थी कृती समितीच्या पदाधिकाऱ्यांनी केली.

**जिल्हाधिकारी कार्यालयासमोर राष्ट्रवादीची निदर्शने आणि मागण्या :**

याच मुद्द्यावरून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या (शरदचंद्र पवार पक्ष) वतीने तीव्र निदर्शने करण्यात आली. यावेळी केंद्र सरकारच्या शिक्षण धोरणाचा निषेध करत आंदोलकांनी आपल्या प्रमुख मागण्या मांडल्या. केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी या संपूर्ण प्रकरणाची नैतिक जबाबदारी स्वीकारून तात्काळ आपल्या पदाचा राजीनामा द्यावा, अशी मागणी करण्यात आली. तसेच एनटीए (NTA) संबंधित विभागाची जबाबदारी निश्चित करून दोषींवर आवश्यक ती कठोर कारवाई करण्यात यावी आणि अशा पेपरफुटी प्रकरणातील संशयास्पद कंपन्यांच्या संचालक असलेल्या संस्थांना भविष्यात कोणतेही काम देण्यात येऊ नये, अशी आग्रही मागणी आंदोलकांनी केली.

**गांधी पुतळ्याजवळ डाव्या आघाडीचे लाक्षणिक उपोषण :**

दुसरीकडे, दिल्लीत सुरू असलेल्या आंदोलनाला आणि सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांच्या भूमिकेला पाठिंबा देण्यासाठी डाव्या आघाडीच्या वतीने शहरातील गांधी पुतळा येथे लाक्षणिक उपोषण करण्यात आले. जंतर-मंतर येथील उपोषणाला आणि सोनम वांगचुक यांच्या बेकायदेशीर अटकेच्या मुद्द्याला धरून धरणे आंदोलन करत आंदोलकांनी प्रशासनाचे लक्ष वेधून घेतले. यात शहरातील सर्व विद्यार्थी व विविध संघटनांनी एकत्र येत केंद्र सरकारच्या भूमिकेचा जाहीर निषेध केला.

# विष्णु पुरी यांना 'महा ॲक्युपंक्चर रत्न 2026' पुरस्काराने गौरव

## आयुष इंटरनॅशनल मेडिकल असोसिएशनतर्फे रुग्णसेवेची दखल

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** मागील २० वर्षांपासून ॲक्युपंक्चरच्या माध्यमातून सातत्याने रुग्णसेवा बजावणारे श्री हरिहर वेलनेस सेंटरचे संचालक विष्णु पुरी यांना 'महा ॲक्युपंक्चर रत्न २०२६' या प्रतिष्ठेच्या पुरस्काराने गौरविण्यात आले. आयुष इंटरनॅशनल मेडिकल असोसिएशन व एजीएमए यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी (दि. १९ जुलै) यशवंतराव चव्हाण नाट्यगृह येथे आयोजित भव्य समारंभात मान्यवरांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

ॲक्युपंक्चर क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य आणि दोन दशकांहून अधिक काळ केलेल्या समर्पित रुग्णसेवेची दखल घेत विष्णु पुरी यांना हा सन्मान देण्यात आला. या सोहळ्यास महाराष्ट्रातील विविध भागांतील ॲक्युपंक्चर थेरपिस्ट मोठ्या संख्येने उपस्थित होते.



कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून मराठी चित्रपट अभिनेते सुयोग गोरे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या अल्पसंख्यांक विभागाचे प्रदेशाध्यक्ष ॲड. नाझेर काझी, ॲड. दत्तात्रय जाधवर आणि ॲड. नागेश सोनुने उपस्थित होते. तसेच व्यासपीठावर आयुष इंटरनॅशनल मेडिकल असोसिएशनचे चेअरमन डॉ. सतीश कराळे, व्हाईस चेअरमन डॉ. नितीनराजे पाटील, राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. बाबुराव कानडे, डॉ. अभिजित कवठकर, प्रशांत सावंत, दिशा चव्हाण, विजय नवल पाटील, तुषार वाघूळदे यांच्यासह संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

# जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या अध्यक्षपदी आ. विलास भुमरे; उपाध्यक्षपदी रामराव शेळके बिनविरोध

## महायुतीच्या सत्ता वाटपाच्या सूत्रानुसार निवड; समर्थकांकडून जल्लोष

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या अध्यक्षपदी पैठणचे आमदार विलास भुमरे यांची, तर उपाध्यक्षपदी भाजपचे रामराव शेळके यांची सोमवारी बिनविरोध निवड करण्यात आली. महायुतीने यापूर्वी ठरविलेल्या सत्ता वाटपाच्या सूत्रानुसार ही निवड झाल्याने जिल्हा बँकेच्या नेतृत्वाबाबतचे चित्र स्पष्ट झाले.



जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या अलीकडील निवडणुकीत महायुतीने स्पष्ट बहुमत मिळविल्यानंतर अध्यक्षपदाच्या वाटपाबाबत शिवसेना, भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांच्यात सहमती झाली होती. त्यानुसार पहिल्या टप्प्यात अध्यक्षपद शिवसेनेकडे, तर उपाध्यक्षपद भाजपकडे देण्याचा निर्णय घेण्यात आला होता. या निर्णयानुसार आ. विलास भुमरे आणि रामराव शेळके यांच्या नावांवर शिक्कामोर्तब करण्यात आले.

निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक (सहकारी संस्था) समृत जाधव यांच्या अध्यक्षतेखाली बँकेच्या सभागृहात सकाळी निवड प्रक्रिया पार पडली. अध्यक्षपदासाठी आ. विलास भुमरे यांच्या उमेदवारी अर्जास पालकमंत्री संजय शिरसाट यांनी सूचक, तर मंत्री अतुल सावे यांनी अनुमोदक म्हणून स्वाक्षरी केली. उपाध्यक्षपदासाठी रामराव शेळके यांच्या अर्जास राष्ट्रवादी काँग्रेसचे अर्जुन पाटील यांनी सूचक, तर आमदार रमेश बोरनारे यांनी अनुमोदन दिले. दोन्ही पदांसाठी प्रत्येकी एकच अर्ज दाखल झाल्याने निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी दोघांची बिनविरोध निवड जाहीर केली.

निवड जाहीर होताच बँकेच्या परिसरात कार्यकर्त्यांनी जल्लोष केला. यावेळी मंत्री अतुल सावे, खासदार संदिपान भुमरे, आमदार अब्दुल सत्तार, आमदार प्रशांत बंब, आमदार सतीश चव्हाण यांच्यासह महायुतीचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी पालकमंत्री संजय शिरसाट यांनी, महायुतीने एकसंघपणे निवडणूक लढविल्यामुळे सर्वाधिक संचालक असलेल्या शिवसेनेला अध्यक्षपदाची संधी देण्यात आल्याचे सांगितले. कोणत्याही पक्षावर अन्याय झालेला नसून परस्पर सहमतीने निर्णय झाल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

मंत्री अतुल सावे यांनीही महायुतीतील तिन्ही पक्षांमध्ये पूर्वनियोजित सत्ता वाटपाचा फॉर्म्युला निश्चित करण्यात आला होता. त्यानुसार शिवसेना आणि भाजप प्रत्येकी दोन वर्षे, तर राष्ट्रवादी काँग्रेस एक वर्ष अध्यक्षपदाची जबाबदारी सांभाळणार असल्याचे सांगितले.

# 'देवाभाऊ कृतज्ञता सेवा सप्ताह' अंतर्गत मनपा शाळांमध्ये चित्रकला स्पर्धा उत्साहात

## विद्यार्थ्यांच्या कलागुणांना मिळाले व्यासपीठ; विजेत्यांचा बक्षीस वितरण समारंभ संपन्न

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर** : महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित 'देवाभाऊ कृतज्ञता सेवा सप्ताह' अंतर्गत महानगरपालिका शाळांतील विद्यार्थ्यांसाठी आयोजित चित्रकला स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. प्रियदर्शिनी मनपा शाळेत पार पडलेल्या या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पकतेचा आणि कलाविष्काराचा उत्कृष्ट नमुना सादर केला.



स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांना स्थायी समितीचे सभापती अनिलभैय्या मकरीये यांच्या हस्ते बक्षिसांचे वितरण करण्यात आले. विद्यार्थ्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची आकर्षक चित्रे रेखाटत त्यांच्याविषयीचा आदर व्यक्त केला. याशिवाय पर्यावरण, स्वच्छता, देशभक्ती, समाजसेवा आदी विविध विषयांवरही विद्यार्थ्यांनी प्रभावी चित्रे साकारून उपस्थितांची दाद मिळवली.

या उपक्रमाचे आयोजन स्थायी समितीचे सभापती अनिलभैय्या मकरीये यांच्या पुढाकाराने करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव देणे, त्यांच्यात सर्जनशीलतेची आवड निर्माण करणे आणि समाजाभिमुख विचारांना प्रोत्साहन देणे हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश असल्याचे आयोजकांनी सांगितले.

कार्यक्रमाला नगरसेविका अर्चनाताई निळकंठ, मुख्याध्यापक संजीव सोनार, दीपक मुंडले, महेश साकोलकर यांच्यासह शिक्षक, पालक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. मान्यवरांनी विद्यार्थ्यांच्या कलाकृतींचे कौतुक करत त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. चित्रकला स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला चालना मिळाल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# दिव्यांग व्यक्तींनी राष्ट्रीय पुरस्कारांसाठी 31 जुलैपर्यंत ऑनलाइन अर्ज करावेत

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी.

**परभणी :** दिव्यांगजन सशक्तीकरण विभागामार्फत वर्ष 2026 च्या दिव्यांग व्यक्तींच्या सक्षमीकरणासाठीच्या राष्ट्रीय पुरस्कारांसाठी अर्ज व नामांकन स्वीकारण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. इच्छुकांनी 31 जुलै 2026 पर्यंत www.awards.gov.in या राष्ट्रीय पुरस्कार पोर्टलवर ऑनलाइन अर्ज सादर करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

राष्ट्रीय पुरस्कारांसाठी अर्ज केवळ ऑनलाइन पद्धतीने स्वीकारले जाणार असून प्रत्यक्ष (Physical Mode) किंवा इतर कोणत्याही माध्यमातून सादर करण्यात आलेले अर्ज ग्राह्य धरले जाणार नाहीत. 31 जुलै 2026 पर्यंत प्राप्त होणाऱ्या सर्व अर्ज व नामांकनांचा वर्ष 2026 च्या राष्ट्रीय पुरस्कारांसाठी विचार करण्यात येईल.

नामांकनामध्ये पोर्टलवर उपलब्ध असलेल्या विहित नमुन्यानुसार सर्व आवश्यक माहिती भरावी. अर्जदाराने केलेली उल्लेखनीय व प्रेरणादायी कामगिरी वर्णनात्मक स्वरूपात स्पष्टपणे नमूद करावी. तसेच संबंधित कामगिरीची पुष्टी करणारी आवश्यक कागदपत्रेही पोर्टलवर अपलोड करावीत. 'सर्वश्रेष्ठ दिव्यांगजन (Most Outstanding Person with Disabilities)', 'श्रेष्ठ दिव्यांगजन (Outstanding Person with Disabilities)' आणि 'श्रेष्ठ सृजनशील दिव्यांग बालक/बालिका (Outstanding Creative Divyang Child)' या उपवर्गांसाठी अर्ज करताना यूडीआयडी (UDID) कार्ड किंवा दिव्यांगत्व प्रमाणपत्र अपलोड करणे अनिवार्य आहे. पात्रता निकष, पुरस्कारांच्या विविध श्रेणी व इतर सविस्तर माहितीसाठी www.depwd.gov.in तसेच www.awards.gov.in या संकेतस्थळांवरील 'दिव्यांग व्यक्तींच्या सक्षमीकरणासाठीच्या राष्ट्रीय पुरस्कारांच्या मार्गदर्शक तत्त्वांचा' संदर्भ घ्यावा.

# सकाळी उद्घाटन, सायंकाळी ₹10 हजारांचा दंड; रस्त्यावर कचरा टाकल्याने 'माधव सोलर एनर्जी'वर कारवाई

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर** : सातारा-देवळाई चौक परिसरातील 'माधव सोलर एनर्जी' या नवीन दुकानाच्या उद्घाटनानंतर सार्वजनिक रस्त्यावर चहा-नाश्त्याचा कचरा टाकल्याप्रकरणी छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेने संबंधित आस्थापनावर ₹१० हजारांचा दंड ठोठावला. उद्घाटन कार्यक्रम रविवारी (दि. १९) पार पडला होता. कार्यक्रमानंतर दुकानासमोरील रस्त्यावर कचरा टाकण्यात आल्याचे घनकचरा व्यवस्थापन विभागाच्या स्वच्छता पाहणी पथकाच्या निदर्शनास आले.




उपायुक्त (घनकचरा व्यवस्थापन) नंदकिशोर भोबे यांच्या आदेशानुसार ही कारवाई करण्यात आली. मनपा आयुक्त अमोल येडगे यांनी स्वच्छता नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध सुरू असलेल्या विशेष मोहिमेअंतर्गत ही कारवाई करण्यात आल्याचे सांगितले. सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकणाऱ्यांवर यापुढेही कठोर कारवाई करण्यात येईल, तसेच आवश्यकतेनुसार गुन्हेही दाखल केले जातील, असा इशाराही त्यांनी दिला. नागरिकांनी व व्यावसायिकांनी कचऱ्याचे योग्य वर्गीकरण करून तो निर्धारित ठिकाणीच टाकावा तसेच सर्व कार्यक्रम 'झिरो वेस्ट' पद्धतीने व पर्यावरणपूरक साजरे करावेत, असे आवाहन त्यांनी केले.

कारवाईवेळी स्वच्छता निरीक्षक उमेश खरात, जवान विनोद कदम तसेच नागरिक मित्र पथकाचे गौतम वानखेडे, संतोष नवगिरे आणि रावसाहेब इधाटे उपस्थित होते.

# आषाढी एकादशी यात्रेसाठी भाविकांना सर्व सुविधा द्या; मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी. एम. यांचे निर्देश

## पंढरपूर येथील श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात अधिकाऱ्यांची आढावा बैठक

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** 25 जुलै रोजी होणाऱ्या आषाढी एकादशी यात्रेसाठी पंढरपूर येथे येणाऱ्या लाखो भाविकांना स्वच्छता, शुद्ध पिण्याचे पाणी, मोफत आरोग्य सेवा, महिला व मुलांसाठी हिरकणी कक्ष, फिरती शौचालये आणि अन्य मूलभूत सुविधा प्रभावीपणे उपलब्ध करून द्याव्यात, असे निर्देश जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी. एम. यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले.



आषाढी एकादशी यात्रेच्या पार्श्वभूमीवर मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी. एम. यांनी सोमवारी पंढरपूर येथील श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिराला भेट देऊन जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि परिसरातील ग्रामपंचायतींच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांची संयुक्त आढावा बैठक घेतली. यात्रेच्या नियोजनाचा सविस्तर आढावा घेत आवश्यक सूचना देताना त्यांनी सर्व विभागांनी समन्वयाने काम करून भाविकांना कोणतीही गैरसोय होणार नाही, याची दक्षता घेण्याचे निर्देश दिले.

यंदाच्या आषाढी एकादशी यात्रेसाठी सुमारे 10 लाख भाविक पंढरपूर येथे येण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. त्यामुळे स्वच्छता, आरोग्य, पाणीपुरवठा, महिला व बालसुरक्षा, वाहतूक आणि आपत्कालीन व्यवस्थापन याबाबत विशेष नियोजन करण्यावर बैठकीत भर देण्यात आला.

बैठकीस जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव साळुंके, अर्थ व बांधकाम सभापती सचिन गरड, पंचायत समितीचे गटविकास अधिकारी शिवाजी साळुंके, जिल्हा परिषद सदस्या विद्या गायकवाड, श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष राजेंद्र पवार, पंचायत समिती सदस्या लताबाई कानडे, पंढरपूरच्या सरपंच वैशाली राऊत, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. प्रसन्ना भाले, महिला व बालविकास प्रकल्प अधिकारी श्रीमती भंडारी, मनीषा कदम, वरिष्ठ पोलीस निरीक्षक रामेश्वर गाडे, विस्तार अधिकारी प्रल्हाद रिंडे, सोळसे, आरोग्य विस्तार अधिकारी एस. आर. वाघ, स्वच्छता विभागाचे संजय वाघ, तालुका समन्वयक प्रमोद भुईगळ, पंढरपूर ग्रामपंचायतीचे ग्रामपंचायत अधिकारी हरीश आंधळे, शेख अख्तर, महेंद्र खोतकर आदी उपस्थित होते.

मुख्य कार्यालय : ऑफिस नं. 515, 5 वा मजला, वास्तू इलाईट स्क्वेअर, बजाज हॉस्पिटल समोर, बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर- 431010

हे पत्र प्रकाशक, मालक श्री. रोहित विकास पाटील यांनी मुद्रक श्री. सय्यद परवेझ अहेमद सय्यद इनायत अली यांच्यामार्फत रेड प्रिंटस् , सी-15, संजयनगर, बायजीपुरा, छत्रपती संभाजीनगर-431001 येथे छापून तिरुपती सुप्रीम एन्क्लेव्ह, जालान नगर, छत्रपती संभाजीनगर- 431001 येथून प्रकाशित केले. ▌संपादक : रोहित विकास पाटील ▌email : hinduprakashvarta@gmail.com ▌epaper.hinduprakashwarta.com ▌PRGI No.: MHMAR/25/A2358 ▌संपर्क क्र. : 7261999911